# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०७ मार्च, २०१७ / फाल्गुन १६, १९३८ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) आदिवासी विकास मंत्री**<br>**(२) उद्योग व खनिकर्म मंत्री**<br>**(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**<br>**(४) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**<br>**(५) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७०**

---

### औरंगाबाद येथे महावितरण कंपनीने वेगवेगळे शुल्क आकारून ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत

**(१) * २९१२५ श्री.सुभाष झांबड** : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील महावितरण कंपनीकडून ग्राहकांना कोणतीही सुचना न देता वाहन शुल्काच्या नावाखाली प्रतियुनिट १ रुपये १८ पैसे अधिकचे शुल्क तसेच अशाच प्रकारे वेगवेगळ्या शुल्काची रक्कम आकारून ग्राहकांची फसवणूक केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, सदर शुल्क आकारताना घरगुती ग्राहक आणि मोठे ग्राहक यांचे वर्गीकरण करुन घरगुती ग्राहकांना यामध्ये सवलत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार आहेत.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या जून, २०१५ च्या वीजदर आदेशानुसार वीजदराची स्थिर आकार व वीज आकार अशी विभागणी होती. सदर वीज आकारामध्ये वहन आकार समाविष्ट होता. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दिनांक ३ नोव्हेंबर, २०१६ च्या वीजदर आदेशानुसार पूर्वीच्या वीज आकाराची विभागणी वीज आकार व वहन आकार अशी करण्यात आली आहे. वहन आकार नव्याने आकारण्यात आलेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गडचिरोली जिल्हयातील ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत**
**प्रस्तावित कामांस होत असलेल्या विलंबाबाबत**

**(२) * २८५८७ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विभागाच्यावतीने आदिवासी दुर्गम भागातील रस्ते, नाले, पाणी इ. समस्या दूर करण्यासाठी सन २०१५-२०१६ मध्ये गडचिरोली जिल्हयात ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत रुपये २ कोटी ८५ लाख रक्कमेच्या ३८ प्रस्तावित कामांना माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये अप्पर आयुक्तांनी मंजूरी देवूनही सदर कामे सुरू झाली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कामे सुरु न झाल्यामुळे मंजूर निधी आर्थिक वर्षअखेर परत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत मंजूर झालेली कामे विनाविलंब हाती घेवून पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

सन २०१५-१६ मध्ये एकूण ११३ कामांना मंजूरी प्रदान करण्यात आली असून त्यापैकी ६० कामे पूर्ण झालेली आहेत व ५३ कामे प्रगतीपथावर आहेत.

सन २०१६-१७ मध्ये एकूण ५८ कामे मंजूर असून त्यांना आचारसंहितेचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. ती सर्व कामे सुरु करण्यात येत आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या प्रकाशगड कार्यालयातील महाव्यवस्थापक यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३) * २९३००  श्री.रविंद्र फाटक, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या प्रकाशगड कार्यालयातील मानव संसाधन विभागात मुख्य महाव्यवस्थापक पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) यासंदर्भात शासनास पृष्टांकित केलेली निवेदने आवश्यक कार्यवाहीसाठी महावितरण कंपनीकडे पाठविण्यात आली आहेत.

(२) यासंदर्भात महावितरण कंपनीच्या कार्यकारी संचालक (मा.सं.) यांनी चौकशी केलेली आहे. चौकशीअंती सदर तक्रारीमध्ये तथ्य आढळून आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ग्रामीण भागातील वीजेची समस्या सोडविण्यासाठी**
**राज्यात सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबत**

**(४) * २६७३४ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीजेची समस्या सोडविण्याकरिता कोणत्याही ग्रामपंचायतीने दहा एकर जागा दिल्यास दोन मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ४० लाख कृषिपंपाना सौरऊर्जेने जोडण्यासाठी ७ हजार प्रकल्प उभारण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाकरिता किती ग्रामपंचायतींनी जागा देण्याबाबत सहमती दर्शविली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकल्पासाठी किती निधीची तरतूद करण्यात येणार आहे व त्याची अंमलबजावणी केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) ते (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिंगेवाडी (जि.बीड) येथील सिंदफणा प्राथमिक मुलींच्या आश्रमशाळेच्या**
**वसतिगृहातील शिक्षक मुलींचा लैगिक छळ करीत असल्याबाबत**

**(५) * २६८३८ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगेवाडी (जि.बीड) येथील सिंदफणा प्राथमिक मुलींच्या आश्रमशाळेच्या वसतिगृहात मुख्याध्यापक तसेच अधिक्षक या पदावर महिला शिक्षक नसल्याने पुरुष शिक्षकांना रात्रीच्या वेळी रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहातील कार्यरत पुरुष शिक्षक मद्यपान करून मुलींचा लैगिक छळ करीत असल्याबाबतच्या तक्रारी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान “लेक लाडकी अभियान”च्या कार्यकर्त्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीअंती कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी अन्य शाळेच्या महिला मुख्याध्यापकांमार्फत चौकशी करण्यात आली. त्यांचे अहवालानुसार तक्रारीत तथ्य आढळल्याने संबंधित सहशिक्षक श्री.डी.एन मस्के यांना निलंबित करुन त्यांचेविरुध्द संबंधित पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद केला आहे. तसेच सहशिक्षक श्री.उनवणे के.व्ही व श्री.ए.एल. काटे या दोन्ही कर्मचा-यांची तीन वर्षाकरिता वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

प्रवेशित मुलींच्या संरक्षणाच्यादृष्टीने खाजगी महिलेची मानधनावर संस्थेमार्फत नियुक्ती केलेली आहे. तसेच चौकशी समिती गठीत करण्यात आली असून समितीमार्फत चौकशीचे कामकाज चालू आहे.

तसेच संचालक विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण पुणे यांनी सुनावणी घेतली असून, सदर शाळेची मान्यता रद्द करण्याबाबत संस्थेला नोटीस बजावली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागातील रिक्त पदे भरण्यासाठी बनावट संकेतस्थळावरुन जाहिरात प्रसिध्द करुन बेरोजगारांची फसवणूक केल्याबाबत

**(६) * २८६००  श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागातील विविध रिक्त पदे भरण्याबाबत बनावट संकेतस्थळावरुन जाहिरात प्रसिध्द करुन लाखो बेरोजगारांची फसवणूक केल्याप्रकरणी नाशिक येथे तिघांना अटक केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दिनांक २३/११/२०१६ च्या गोपनीय पत्रान्वये पोलीस आयुक्त, नाशिक शहर, नाशिक यांना आदिवासी विकास विभागाच्या संकेतस्थळावरील सर्व मजकुराची प्रिंट काढून सदर आरोपींवर शासनाच्या अधिकाराचा गैरवापर केल्याबाबत कारवाई करण्यास कळविले आहे. तसेच पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखा युनिट-२ नाशिक शहर, नाशिक यांचेकडून सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू तालुक्यात हंगामी वसतिगृह सुरू करण्याबाबत

**(७) * २८९२१ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात १० ठिकाणी हंगामी वसतिगृह सुरू करण्याबाबत पालघर जिल्हापरिषदेने मंजूर केलेला प्रस्ताव माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहे सुरू झाली नसल्यामुळे वसतिगृहाअभावी कुटुंबियांसह विद्यार्थ्यांचेही स्थलांतर झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हंगामी वसतिगृह सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) डहाणू प्रकल्पांतर्गत आदिवासी मुला-मुलींसाठी १७ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यांची मंजूर क्षमता १४५० एवढी आहे. तथापि, वाढीव मागणी लक्षात घेता सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात १७०४ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. तसेच वसतिगृहात प्रवेश न मिळालेले विद्यार्थी आर्थिक

परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नयेत याकरीता थेट लाभ हस्तांतरण (DBT) धोरणानुसार इत्यादी १२ वी नंतरच्या उच्च शिक्षणासाठी आवश्यक निवास, भोजन व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्याविषयी तरतूद असलेली "पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना" दिनांक १५/१०/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोनेगाव (बाई) (ता.देवळी, जि.वर्धा) गावातील शेतामध्ये बेकायदेशीरपणे विद्युत खांबाची उभारणी करताना एका बाल कामगाराचा मृत्यू झाल्याबाबत**

**(८) * २८७९९ श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनेगाव (बाई) (ता.देवळी, जि.वर्धा) गावातील एका शेतामध्ये बेकायदेशीरपणे विद्युत खांबाची उभारणी करताना एका बाल कामगाराचा मृत्यू झाल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेत मालकाने पोल उभारण्याकरीता कुठलीही परवानगी प्राधिकरण वा महावितरणकडून घेतलेली नव्हती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कंत्राटदार व शेत मालक तसेच महावितरणचे संबंधित अधिकारी यांचेवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) दिनांक ११ नोव्हेंबर, २०१६ रोजी मौ. सोनेगांव (बाई) येथे श्री. वैद्य यांच्या शेतातील विहिरीवर विद्युत पुरवठा घेण्यासाठी अनधिकृतरित्या दोन सिमेंटचे खांब उभे करीत असताना चि. आनंद याचा अपघात झाला व तद्नंतर त्याचा दिनांक १८/११/२०१६ रोजी मुत्यू झाल्याचे निदर्शनास आले.

(२) हे खरे आहे.

(३) सदर शेतमालकाने शेतामध्ये दोन खांब उभारण्याकरिता महावितरण कार्यालयास कुठलीही पूर्व सूचना दिली नव्हती. तसेच परवानगी घेतलेली नव्हती उपकार्यकारी अभियंता, देवळी यांनी घटनास्थळी तपासणी केली असता दोन

सिमेंटचे खांब खड्डयाजवळ पडलेले आढळले. दोन्ही खांबाची तपासणी केली असता ते खांब महावितरण कंपनीच्या मालकीचे नसल्याचे निदर्शनास आले. शेतमालक श्री. वैद्य यांनी त्यांच्या शेतातील विहिरीवर महावितरण कंपनीमार्फत कृषीपंपासाठी विद्युत जोडणी घेण्यासाठी वायगांव वितरण केंद्रात नवीन विद्युत पुरवठयासाठी अर्ज सुध्दा सादर केलेला नाही. उपकार्यकारी अभियंता, देवळी यांनी पोलीस स्टेशन, देवळी यांना या प्रकरणी चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत त्यांच्या दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(९) * २८९४६ अॅड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सन २००० ते २००३ या दरम्यान अंदाजे रुपये ३५० कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे बँकेच्या लेखा परीक्षणात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ व ८८ अन्वये चौकशी करण्यात आली. तथापि, कलम ८३ खालील चौकशी अहवालाविरूध्द शासनाकडे दाखल केलेल्या पुनरिक्षण अर्ज प्रकरणी शासनाने दि.३०/६/२०१५ च्या आदेशान्वये चौकशी अहवाल रद्द केला आहे. तसेच कलम ८८ खालील चौकशी अहवालामध्ये बँकेचे नुकसान झाले नाही, असे नमूद आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तींवर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बेस्ट उपक्रमाने वसुल केलेल्या अतिरिक्त परिवहन तूट कराची रक्कम ग्राहकांना परत देण्याबाबत**

**(१०) * २६९२१ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने बेस्ट उपक्रमाला सन २०१६ पासून परिवहन तूट (टीडीएलआर) घेऊ नये असे आदेश दिले असताना देखील एप्रिल ते सप्टेंबर, २०१६ पर्यंत बेस्टने अतिरिक्त परिवहन तूट कर ग्राहकांकडून वसूल केल्याचे माहे डिसेंबर, २०१६ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल ते सप्टेंबर, २०१६ या कालावधीत बेस्टने परिवहन तुटीच्या नावाखाली ग्राहकांकडून रुपये ३१९५ कोटी अनधिकृतपणे वसूल केले असल्याने ती रक्कम बेस्ट प्रशासन ग्राहकांना परत करणार आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) सदर बाब न्यायप्रविष्ट आहे. TDLR वसूली सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम निर्णय व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार दिनांक १/१०/२०१६ पासून वसुल करण्याचे थांबविण्यात आलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाने परिवहन विभाग तूट परताव्याची बाब त्रिसदस्यीय खंडपीठाकडे विचारार्थ पाठविलेली असून सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉरच्या विद्यमान टप्प्यातुन नाशिकला वगळण्यात आल्याबाबत

**(११) * २७४२० डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील प्रस्तावित दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉर प्रकल्पाकरिता गंगापुर व दारणा समुहातील ८६ टक्के पाणी बिगर सिंचनासाठी आरक्षित असल्यामुळे २३.७३ द.ल.घ.मी. पाणी देता येणार नसल्याचे जलसंपदा विभागाने कळविल्यामुळे दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर प्रकल्पांतर्गत इगतपुरी-नाशिक-सिन्नर या औद्योगिक क्षेत्रांची कार्यवाही तात्पुरती थांबविण्यात आली असून पाण्याविषयीच्या तांत्रिक अडचणींचे निराकरण झाल्यानंतर या प्रकल्पाचे काम सुरु करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य जलनितीनुसार पाण्याच्या वापराबाबत प्रथम प्राधान्य पिण्यासाठी, दुसरे सिंचनासाठी व तिसरे औद्योगिक प्रयोजनासाठी असल्याने दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉरसाठी गोदावरी खोऱ्यातुन सद्यस्थितीत नाशिक जिल्हयातील उपलब्ध पाण्यातुन मागणीप्रमाणे पाणी देणे शक्य नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भविष्यात पाणी उपलब्ध झाल्यास राष्ट्रीय जलविकास प्राधिकरणाकडून दोन आंतरराज्य खोरे जोडणी योजनेंतर्गत पश्चिम वाहिनी नद्यातील पाणी उपसा करून गोदावरी खोऱ्यात वळविल्यास प्रस्तावित मेगा इंडस्ट्रियल पार्कसाठी २३.७३ द.ल.घ.मी./८३८.०२५ द.ल.घ.मी. पाणी उपलब्ध होवू शकेल असे जलसंपदा विभागाने नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केवळ २३.७३ द.ल.घ.मी. पाण्याअभावी दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर प्रकल्पापासून नाशिक वंचित राहू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरसाठी गोदावरी खोऱ्यातून सद्य:स्थितीत नाशिक जिल्ह्यातील उपलब्ध पाण्यातून मागणीप्रमाणे पाणी देणे शक्य नाही. भविष्यात पश्चिम वाहिनी वळण योजनांचे पाणी उपलब्ध झाल्यास, त्यावेळेची परिस्थिती पाहून त्यांना पाणी देणे शक्य होईल.

-----------------

**विदर्भातील विविध संस्थाचालकांनी विद्यार्थ्यांचे कागदोपत्री बोगस प्रवेश दाखवून शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार केल्याबाबत**

**(१२) * २८७०४ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील नागपूर शहरातील कुसुमताई वानखेडे व्यवसायिक प्रशिक्षण केंद्र, बजाजनगर येथील व्यवसायिक प्रशिक्षण केंद्र, विवेकांनद महाविद्यालय तसेच विभागातील अनेक शिक्षण संस्थाचालकांनी विद्यार्थ्यांचे कागदोपत्री बोगस प्रवेश दाखवून शिष्यवृत्तीमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर विभागात बोगस विद्यार्थी संख्या दाखवून शिष्यवृत्तीचा अपहार करणाऱ्या किती संस्था आहेत,

(३) असल्यास, उक्त संस्थाचालकावर शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे, यासंदर्भात नागपूर शहरातील कुसुमताई वानखेडे व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र व बजाजनगर येथील व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, विवेकानंद महाविद्यालय या संस्थाविरोधात बजाजनगर पोलीस स्टेशन येथे दिनांक ०४/०१/२०१७ रोजी गुन्हा क्र. ३/२०१७ दाखल झालेला आहे. तसेच विभागातील इतर संस्थांबाबत SIT मार्फत चौकशी सुरु आहे.

(२) व (३) सदर बाबत चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांच्या पीक कर्जावरील दोन महिन्यांच्या व्याज माफीची मा.पंतप्रधानांनी केलेली घोषणेबाबत**

**(१३) * २६८६० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.पंतप्रधानांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या रब्बी पीक कर्जावरील दोन महिन्यांचे व्याज माफ करण्याची घोषणा माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत जिल्हा बँकेकडून शेतकऱ्यांना रुपये ४० हजार कर्ज दिल्यास फक्त रुपये २०० इतकी सुट मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांचे कर्ज व्याजासहीत माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: हे खरे आहे.

(३) सदर योजना केंद्र शासनाची असून नाबार्डमार्फत राबविली जात असल्यामुळे राज्य शासनाचा सहभाग नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डोलवली (ता.खालापूर, जि.रायगड) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थीनीच्या मृत्यूची चौकशी करण्याबाबत**

**(१४) * २६९४४ श्री.नारायण राणे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोलवली (ता.खालापूर, जि.रायगड) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील इयत्ता सहावीतील एका विद्यार्थीनीचा दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास संशयास्पद मृत्यू झाला असून यांस आश्रमशाळा जबाबदार असल्याचा आरोप मुलीच्या कुटुंबियांनी केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळेतील महिला अधिक्षकाचे पद मागील २ वर्षापासून रिक्त असल्याचे तसेच आश्रमशाळेत १६६ विद्यार्थी असून शिक्षक अत्याचार करित असल्याने काही महिन्यापूर्वीच एक विद्यार्थी पळून गेल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी होवून विद्यार्थीनीच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत जिल्हा परिषद सदस्य व अन्य लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) कु.यमुना वासुदेव खडके, इत्यादी ६ वी हिचा दिनांक १३/१/२०१७ रोजी पहाटे डोलवली शासकीय आश्रमशाळेत मृत्यू झाला असून शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाला नसल्याने मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

तसेच मुलीच्या कुटुंबियांनी तिच्या मृत्यूस आश्रमशाळा जबाबदार असल्याबाबत कुठलीही तक्रार केलेली नाही.
(२) सदर आश्रमशाळेतील स्त्री अधिक्षिकेचे पद रिक्त असून सदर पदाचा प्रभार शाळेतील जेष्ठ शिक्षिका यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे.

तसेच सदर आश्रमशाळेतील इयत्ता ७ वी मध्ये शिक्षण घेणारा विद्यार्थी कु. सोमनाथ परशुराम वाघमारे यांचे दिनांक १२/१०/२०१६ रोजी शाळेतील इतर दोन विद्यार्थ्यांशी भांडण झाल्याने त्याचा राग धरून तो शाळेतून विना परवानगी बाहेर गेला होता, परंतु सदर विद्यार्थ्यास परत शाळेत आणण्यात आले असून सद्यस्थितीत तो शाळेत शिक्षण घेत आहे.
(३), (४) व (५) हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा. श्री. मनोहर भोईर, विधानसभा सदस्य, यांनी दिनांक १९/१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्रकरणी चौकशी करण्याची व मृत विद्यार्थीनीच्या पालकास आर्थिक सहाय्य देण्याबाबत विनंती केली आहे. त्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांचेकडून अहवाल प्राप्त करून घेण्यात आला. त्यानुसार कु. यमुना वासुदेव खडके, या विद्यार्थीनीला तिच्या मृत्यूपूर्वी दिनांक ९/१/२०१७ व दिनांक १२/१/२०१७ रोजी शासकीय आश्रमशाळा डोलवली येथील कर्मचाऱ्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, खालापुर, जि. रायगड येथे उपचारार्थ नेलेले होते. तथापि, तिच्या मृत्यूबाबत शवविच्छेदन

अहवाल प्राप्त झाला नसल्याने मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**अमरावती जिल्हयात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या. मध्ये आय.टी.आय. (तारतंत्री) प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना वाढीव विद्यावेतन देण्याबाबत**

**(१५) * २८५०० श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या. मध्ये आय.टी.आय. (तारतंत्री) विद्यार्थ्यांची प्रशिक्षणासाठी तुटपुंज्या मानधनावर निवड करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने दिनांक २२ सप्टेंबर, २०१४ रोजी राजपत्र प्रकाशित करुन शिकाऊ उमेदवारांच्या मानधनामध्ये रुपये २८०० वरुन रुपये ७००० इतकी वाढ केली असताना माजी शिकाऊ विद्यार्थ्यांना मागील ९ महिन्यापासून वाढीव विद्यावेतन मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्या (ग्रामीण) अमरावती यांना दिनांक १९ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे खरे नाही. महावितरण कंपनीने त्यांचे प्रशासकीय परिपत्रक दिनांक ०५/०५/२०१५ अनुसार उमेदवारांच्या विद्यावेतनामध्ये वाढ केली असून, काही शिकाऊ उमेदवारांची निवड सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित होण्यापूर्वी झाली होती. सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने अमरावती जिल्हयातील सर्व माजी शिकाऊ उमेदवारांना माहे जुलै, २०१६ मध्ये वाढीव विद्यावेतनानुसार देय असणारी फरकाची रक्कम अदा करण्यात आली आहे.

(३) होय.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पतसंस्था नियामक मंडळ स्थापन करण्याबाबत**

**(१६) * २६९५९ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५ हजार ४७० सहकारी पतसंस्थांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पतसंस्था नियामक मंडळ स्थापन करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पतसंस्थेच्या कर्जाच्या व्याजाचे दर व ठेवीचे व्याजाचे दर यामध्ये समानता आणण्यासाठी महाराष्ट्र सहकारी पतसंस्था अधिनियमन १९६० मध्ये बदल करण्याचे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पतसंस्था नियामक मंडळाच्या स्थापनेस संस्थेच्या फेडरेशनने विरोध केला असून प्रक्रियेमध्ये पतसंस्थांचे प्रतिनिधी, फेडरेशनचे पदाधिकारी यांना सामावून घेणे, नोटा बंदीच्या निर्णयानंतर सदर सहकारी संस्थांना सवलत देणे तसेच संस्थेवरील नियम शिथिल करण्याची मागणी पतसंस्था चालकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) प्रस्तावित पतसंस्था नियामक मंडळ हे अध्यक्ष व इतर ८ सदस्यांचे मिळून असेल. निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे हे नियामक मंडळाचे अध्यक्ष असतील, या मंडळात अपर निबंधक, सहकारी बँकेतील निवृत्त अधिकारी, सनदी लेखापाल, पतसंस्थांचे प्रतिनिधी इत्यादींचा समावेश असेल.

पतसंस्था नियामक मंडळाच्या स्थापनेस पतसंस्था फेडरेशनने विरोध केल्याबाबतचे निवेदन शासनास प्राप्त नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## झिराड (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे शितपेयांच्या दुकानात अवैध मद्य विकणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१७) * २६७२२ श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झिराड (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे एका शितपेयाच्या दुकानावर टाकलेल्या धाडीत लाखो रुपयांची अवैध मद्य आढळल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग ते रेवस या मार्गावर असणाऱ्या प्रशांत कोल्ड्रिंग सेंटरमध्ये वेगवेगळ्या ब्रँडचे मद्य व बिअरची राजरोसपणे विक्री करण्यात येत असून मांडवा सागरी पोलीस स्टेशन पासून जवळच असणाऱ्या या दुकानांसंदर्भात ग्रामस्थांनी अनेकदा लेखी तक्रारी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामसभेत यासंदर्भात ठराव होऊन सुध्दा स्थानिक पोलीस प्रशासन व राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी यांनी कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी दोषी व्यक्तींवर कारवाई न करणारे पोलीस प्रशासन तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) होय. हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. मौजे झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड येथे शीतपेयाच्या दुकानातून बेकायदेशीर मद्याची विक्री होत असलेबाबत ग्रामस्थांनी ग्रामसभेमध्ये ठराव करून तक्रार अर्ज शासनाच्या वेब पोर्टलवर प्राप्त झाल्यानंतर सदर ठिकाणी मांडवी सागरी पोलीस स्टेशन यांनी मौजे झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड या ठिकाणी दिनांक २२/१/२०१७ रोजी छापा टाकून रुपये २.५५ लाख इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच, महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अन्वये गुन्हा नोंदविलेला आहे.

(४) व (५) मौजे झिराड, ता.अलिबाग, जि.रागयड या ठिकाणी कारवाई झालेली असल्यामुळे अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील आरसीएफ थळ कंपनीतील प्रदुषित सांडपाणी खोल समुद्रात वाहून नेणारी पाईपलाईन वर आल्याने नवगाव बंदर व कोकण किनारपट्टीस निर्माण झालेला धोका

**(१८) * २८०८८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील आरसीएफ थळ कंपनीतील प्रदुषित सांडपाणी वाहून नेणारी खोल समुद्रात टाकण्यात आलेली पाईपलाईन वर आल्याने नवगाव बंदरातून ये-जा करणाऱ्या मच्छिमार बोटींसाठी अडथळा निर्माण झाल्याने एक मच्छिमार बोट पाईपलाईनवर धडकुन फुटल्याने लाखो रूपयांचे नुकसान झाल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भविष्यात प्रदुषित सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन अशाच प्रकारच्या धक्क्याने फुटली तर कोकण किनारपट्टीवर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पाईपलाईनच्या दुरूस्ती व देखभालीकडे दुर्लक्ष करणाऱ्या आरसीएफ कंपनीच्या प्रशासनाविरूद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) होय.

(२), (३) व (४) आसीएफ कंपनीचे प्रदुषित सांडपाणी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या निकषानुसार पाईपालाईनद्वारे खोल समुद्रात सोडण्यात आले आहे. सदरची पाईपलाईन समुद्र तळाशी खडकाळ भागाचा आधार घेऊन टाकण्यात आली आहे. ओहोटीच्यावेळी पाण्याची पातळी कमी झाल्याने मच्छिमार नौकांचा तळाचा भाग पाईपलाईनच्या वरच्या भागास लागण्याची शक्यता असते. या प्रश्नावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्यादृष्टीने कंपनीने जिल्हाधिकारी, रायगड यांच्या सल्ल्यानुसार विशेष तज्ञांच्या मदतीने थळ-नवगांव या गावाच्या मच्छिमारांच्या सुविधेकरीता जेटी बांधण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

-----------------

**अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यातील वीज जोडणीची रक्कम भरलेल्या शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याबाबत**

**(१९) * २६८८५ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यात वीज जोडणी मिळणेसाठी सन २०१० साली इन्फ्रा १ व इन्फ्रा २ अशा विविध योजना राबविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत तालुक्यातील २१५७ शेतकऱ्यांपैकी ६८५ शेतकऱ्यांनी महावितरण आपल्या दारी या योजनेंतर्गत वीज जोडणी केली असून उर्वरीत १४७२ शेतक-यांनी ५ एच.पी.च्या मोटारसाठी रुपये ६७५० या प्रमाणे शासनाकडे पैशाचा भरणा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत महावितरण कंपनी व संबंधित मा.मंत्री महोदयांकडे वारंवार मागणी केली असता निधी अभावी काम होऊ शकत नसल्याचे कंपनीकडून कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पाण्याची उपलब्धता असताना वीजेअभावी शेतकऱ्यांची पिके जळत असल्याने त्यांना वीज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सन २००८ मध्ये पायाभुत सुविधा आराखडा-१ व सन २०१३ मध्ये पायाभुत सुविधा आराखडा-२ च्या कामाचे कार्यादेश देण्यात आले होते. पायाभुत सुविधा आराखडा-१ अंतर्गत वीज जोडणी देण्याचे प्रयोजन नव्हते.

(२) पायाभुत सुविधा आराखडा-१, पायाभुत सुविधा आराखडा-२ व शेतीपंप विद्युतीकरण योजनेमध्ये महावितरण आपल्या दारी योजनेअंतर्गत केबलद्वारे देण्यात आलेले वीज जोडण्यांसाठी पायाभुत सुविधा उभारण्याची तरतूद नव्हती. परंतु सन २०१०-११ व सन २०११-१२ मध्ये राबविण्यात आलेल्या महावितरण आपल्या दारी योजनेअंतर्गत अक्कलकोट तालुक्यामध्ये २१५७ कृषी ग्राहकांना केबलद्वारे वीज पुरवठा करण्यात आला. त्यापैकी ६८५ कृषी ग्राहकांना उपलब्ध असलेल्या निधीमधुन पायाभूत सुविधा उभारणी करुन रितसर वीज पुरवठा करण्यात आला आहे. उर्वरित १४७२ कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा अद्याप

केबलद्वारे सुरु आहे. या योजनेमध्ये ५ एच.पी. मोटारच्या वीज जोडणीसाठी रुपये ६७५०/-प्रमाणे कोटेशनची रक्कम भरणा करुन घेण्यात आली आहे.

(३) महावितरण आपल्या दारी ही योजना आता अस्तित्वात नसल्याने नवीन योजनेचा प्रस्ताव महावितरण कंपनीने सादर केला आहे.

(४) महावितरण आपल्या दारी योजनेंतर्गत देण्यात आलेल्या वीज जोडण्यांना केबलद्वारे वीज पुरवठा चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## फुरसुंगी (जि.पुणे) येथील सासवड रस्त्यावरील मंतरवाडी (उरुळी देवाची) ते कात्रज या बाहयवळण मार्गावरील वीजेचे खांब व रोहित्र हटविण्याबाबत

**(२०) * २६९७४ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुरसुंगी (जि.पुणे) येथील सासवड रस्त्यावरील मंतरवाडी (उरुळी देवाची) ते कात्रज या बाहयवळण मार्गावर रोहित्र व अनेक वीजेचे खांब असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंतरवाडी ते उंड्री यादरम्यान वाहतूक कोंडी होऊन अपघात होण्याचा धोका निर्माण झाल्यामुळे सदर वीजेचे खांब व रोहित्र हटविण्याची मागणी येथील नागरीकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम प्रकल्प, उपविभाग क्र.१, पुणे यांच्याकडून रस्त्यावरील वीजेचे खांब, लघुदाब, उच्चदाब वीज वाहिनी हलविण्याबाबत दिनांक २१/०१/२०१७ चे पत्र प्राप्त झाले आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग व महावितरणकडून संयुक्त पाहणी करुन अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून वीजेचे खांब व रोहित्र हलविण्यासाठी एकूण अंदाजपत्रकाची रक्कम रुपये ६.९६ कोटी एवढी आहे. तथापि, सदरील खर्चाबाबतचा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर महावितरण कंपनीकडून सदरचे काम करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिंगोली जिल्हयातील पैनगंगा नदीवरील बंधाऱ्यांच्या पाण्याचा उपसा करण्यासाठी वीज जोडणी देण्याबाबत**

**(२१) * २८१३२ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील पैनगंगा नदीवर बंधाऱ्याद्वारे अडविण्यात आलेले पाणी उपसा करण्यासाठी ७३११ शेतीपंपाना वीज जोडणी मिळण्याबाबत रुपये ५२ कोटी निधीचा प्रस्ताव महापारेषणकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

तथापि, कृषीपंपाना वीज जोडणीबाबतचा प्रस्ताव महावितरण कंपनीशी संबंधित आहे.

(२) याबाबतचा प्रस्ताव महावितरण कंपनीकडून नुकताच प्राप्त झाला असून तो तपासण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्हयातील सुमारे ५० हजारांपेक्षा अधिक लाभार्थ्यांना निराधार योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(२२) * २६८६३ श्री.प्रकाश गजभिये, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयात शासनातर्फे राबविण्यात येत असलेल्या संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजना, इंदिरा गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी अपंग आर्थिक सहाय्यता योजनांसाठी गत सहा महिन्यापासून निधी मिळाला नसल्याने पन्नास हजार लाभार्थी सदर लाभांपासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच नंदूरबार व धुळे जिल्हयात संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी वृध्दापकालीन योजना व श्रावणबाळ योजनेच्या सादर केलेल्या प्रस्तावांना मागील दीड ते दोन वर्षापासून मंजूरी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेतील अधिक्षक व गृहपालांची (पुरुष व महिलांची) रिक्त पदे भरण्याबाबत

**(२३) * २८८९३ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, प्रा.अनिल सोले, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी विकास विभागाच्या मुला/मुलींची ५५२ निवासी मंजुर आश्रमशाळांपैकी ५३१ निवासी आश्रमशाळा सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आश्रमशाळेतील अधिक्षक व गृहपालांची (पुरुष व महिलांची) ३२५ रिक्त पदे न भरल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण पडून वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त ३२५ रिक्त जागा भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) राज्यात आदिवासी विभागाच्या अधिनस्त एकुण ५५२ शासकीय आदिवासी आश्रमशाळा मंजुर असून सद्यस्थितीत ५२९ शासकीय आश्रमशाळा सुरू आहेत तर विभागाच्या अधिनस्त ४९५ इतकी वसतीगृहे मंजुर असून त्यापैकी ४९१ वसतिगृहे सुरू आहेत.
(२) व (३) शासकिय आश्रमशाळांसाठी अधिक्षक (पुरूष /महिला) यांची ११०३ पदे मंजुर आहेत. त्यापैकी ७२७ पदे भरलेली असून ३७६ पदे रिक्त आहेत. तर गृहपालांची (पुरूष/महिला) अशी ५२९ पदे मंजुर असून ४०२ पदे भरलेली आहेत, तर १२७ पदे रिक्त आहेत.

अधिक्षकांच्या (पुरूष/महिला) रिक्त पदावर त्याच शासकीय आश्रमशाळेतील शिक्षकाकडे अधिक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार तर महिला शिक्षिकेकडे महिला अधिक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

सरळसेवा कोटयातील पदभरतीबाबत वित्त विभागाच्या दिनांक २ जून, २०१५ व सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १६/०७/२०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्बंध होते. तथापि उक्त पदांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या व आवश्यकता लक्षात घेवून उक्त शासन निर्णयातील अटी शिथिल करून एकूण रिक्त पदांच्या ८०% च्या मर्यादेत पदे भरण्यास शासन निर्णय दिनांक १७/१२/२०१६ अन्वये मान्यता देण्यात आली असून पदभरतीबाबत कार्यवाही अपर आयुक्त यांच्या स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कांदा पिकाला भाव देण्याबाबत

**(२४) * २७३१५ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २३६११ ला दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नाशिक व शिरुर (जि.पुणे) कांदा पिकाचे भाव घसरल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्पादन खर्चही निघत नसल्याने नाशिक जिल्ह्यातील सटाणा, चांदवड, लासलगांव, उमराणा इत्यादी ठिकाणी शेतकऱ्यांकडून माहे डिसेंबर, २०१६ मध्ये रास्ता रोको आंदोलन करण्यांत आले तसेच उत्पादन खर्चावर आधारीत हमी भाव मिळावा व कांदा निर्यातीला प्रोत्साहन देणाऱ्या (एमईआयएमएफ) निर्यातीबाबतच्या योजनेस मुदतवाढ देण्याची मागणी जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही आहे काय,

(३) असल्यास, कृषी उत्पन्न बाजार समिती, नवी मुंबई वगळता राज्यातील इतर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये माहे जुलै-ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान विक्री केलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रती क्विंटल रुपये १०० अनुदान देण्याच्या प्रस्तावावरील कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाशिक जिल्ह्यात जानेवारी, २०१७ मध्ये कांदा पिकाची आवक मागील वर्षाच्या तुलनेत अधिक असल्याने भाव कमी झाले होते.

शिरुर, जि.पुणे येथे कांद्याची आवक होत नाही.

(२) डिसेंबर,२०१६ मध्ये सटाणा, उमराणा येथे कांद्यावरील निर्यात बंदी उठवावी तसेच निर्यात चालू ठेवावी याकरिता रास्ता रोको आंदोलन केले आहे.

(३) कृषी उत्पन्न बाजार समिती, नवी मुंबई वगळता राज्यातील इतर कृषी उत्पन्न बाजार समित्यामध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना अनुदान देण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना विनाविलंब स्वेटरची रक्कम देण्याबाबत

**(२५) * २८२९९ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभागामार्फत स्वेटर पुरविण्याची योजना राबविली जात असून काही विद्यार्थ्यांच्या स्वेटरची रक्कम मुख्याध्यापकाच्या खात्यामध्ये जमा करण्यात येऊन नंतर विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये वळती करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या विद्यार्थ्यांच्या स्वेटरची रक्कम मुख्याध्यापकांच्या खात्यात जमा करण्यात आली होती, त्या विद्यार्थ्यांना सदर रक्कम प्राप्त झाली आहे काय तसेच उपरोक्त प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना स्वेटर मिळण्यास विलंब झाला, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ज्या विद्यार्थ्यांचे बचत खाते नाही अशा विद्यार्थ्यांना स्वेटरची रक्कम न मिळाल्याने सदर योजनेचा लाभ घेता आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ज्या विद्यार्थ्यांचे बँक खाते यापुर्वीच उघडण्यात आले होते, त्यांच्या बँक खात्यात एका आठवडयाच्या आत रक्कम जमा करण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांचे बँक खाते नाहीत त्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या खात्यात सदर रक्कम जमा करण्यात आली आहे. एकूण १,८७,३९२ विद्यार्थ्यांपैकी १,५३,७६२ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्यात आली आहे.
(३), (४) व (५) उर्वरित विद्यार्थ्यांचे बॅक खाते उघडून खात्यात रक्कम जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**शालेय शिक्षण विभागाप्रमाणे अपंग शाळांमधील शारिरीक शिक्षक व निदेशक यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबत**

**(२६) * २६७८३ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अपंग शाळेतील आणि शालेय शिक्षण विभागातील सर्वसाधारण शाळांमधील शारिरीक शिक्षक व निदेशक हे एकाच प्रकारचे काम करीत असून देखील चौथ्या, पाचव्या व सहाव्या वेतन श्रेणीत तफावत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय शिक्षण विभागाप्रमाणे अपंग शाळांमधील शारिरीक शिक्षक व निदेशक यांना एकच समकक्ष वेतनश्रेणी लागू करण्यांत यावी असा अभिप्राय अपंग कल्याण आयुक्त, पुणे यांनी सचिव, सामाजिक न्याय विभाग यांना सन २००९ मध्ये केला असतानांही अपंग शाळेतील शारिरीक शिक्षक व निदेशक यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) व (३) शालेय शिक्षण विभागाप्रमाणे अपंग शाळांमधील शारिरीक शिक्षक व निदेशक यांना एकच समकक्ष वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात देशी-विदेशी मद्य व मद्यार्काच्या अवैधपणे तस्करीला प्रतिबंध करण्यासाठी जीपीएस "ट्रॅक ॲण्ड ट्रेस" प्रकल्प राबविण्याबाबत

**(२७) * २८४०८ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात देशी-विदेशी मद्य व मद्यार्काच्या अवैधपणे तस्करीला आळा घालण्याच्यादृष्टीने तस्करी करणाऱ्या वाहनांचा शोध घेण्यासाठी जीपीएस "ट्रॅक ॲण्ड ट्रेस" प्रकल्प राबविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाकरीता शासनाने उत्पादन शुल्क आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली तज्ञांची समिती स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, त्यानुसार प्रत्यक्षात अंमलबजावणी केव्हा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) अवैध मद्य, मद्य व मद्यार्काची अवैध विक्री इत्यादी कारणांमुळे शासनास उत्पादन शुल्कापासून मिळणाऱ्या महसूलाची गळती थांबवून महसूल वाढीसंदर्भात उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने ट्रॅक ॲन्ड ट्रेस प्रणाली विकसित करणे, संगणक प्रणाली विकसित करण्याकरिता शासन निर्णय दिनांक २१/१/२०१७ अन्वये आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांचे अध्यक्षतेखाली तज्ञ समिती गठीत करण्यात आली आहे. सदरहू प्रकरणी समितीमार्फत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मौजे पाथरुड (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथे दलितवस्ती सुधार योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२८) * २९०८० श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाथरुड (ता.भूम, जि.उस्मानाबाद) ग्रामपंचायत हद्दीत दलितवस्ती सुधार योजनेंतर्गत सुरु असलेले काम निकृष्ट दर्जाचे होत असून सदर कामात गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, मुख्य कार्यकारी अधिकारी, उस्मानाबाद, गटविकास अधिकारी, पंचायत समिती भूम व सरपंच/ग्रामविकास अधिकारी, पाथरुड यांना दिनांक २६ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) ग्रामस्थांच्या निवेदनाच्या अनुषंगाने तपासणी करण्यात आलेली असून सदर कामात गैरव्यवहार किंवा अपहार झालेला आढळून आलेला नाही.

-----------------

## धुळगाव (ता.येवला, जि.नाशिक) येथे यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेसाठी जमीन उपलब्ध करुन देणेबाबत

**(२९) * २७१७६ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विमुक्त जाती, भटक्या जमाती घटकांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविणेसाठी गट विकास अधिकारी येवला यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजी धुळगाव (ता.येवला, जि. नाशिक) येथे जमीन उपलब्ध करुन देऊनही दिनांक २३ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत सदर योजना राबविणेसाठी समाजकल्याण विभाग, नाशिक यांचेकडून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) गटविकास अधिकारी पंचायत समिती, येवला यांचेमार्फत ग्रामपंचायत ठरावाव्दारे एकमताने जमीन हस्तांतरीत करण्यासाठी मंजूरी देण्यात आली. तथापि, जमिनीच्या मोजणी अभावी सदर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा समाजकल्याण कार्यालयास प्राप्त झालेला नाही. उपअधिक्षक, भूमी अभिलेख, येवला व ग्रुपग्रामपंचायत, धुळगांव ता.येवला यांचेकडून जमीन मोजणी अहवाल प्राप्त करून घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यात प्रत्येक जिल्हयात युवा वसतिगृह सुरु करण्याबाबत**

**(३०) * २८४६३ श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी युवा वसतिगृह उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार सदर युवा वसतिगृहास अनुदान देऊन वसतिगृहे पूर्ण क्षमतेने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धनगर समाजाला आरक्षण देण्यासंदर्भातील टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई (टीस) च्या अहवालाबाबत

**(३१) * २६७६३ श्री.संजय दत्त, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरिशभाई पटेल, ॲड.निरंजन डावखरे, श्री.शरद रणपिसे, श्री.नारायण राणे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २८ लाख धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबतचा प्रश्न प्रलंबित असून उक्त मागणीसाठी परभणी व इतर जिल्ह्यातील सदर समाजातील नागरीकांनी सन २०१६-२०१७ या दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांना निवेदने देऊन आंदोलने व मार्चे काढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करुन अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्यासंदर्भातील मागणीच्या अनुषंगाने टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई (टीस) या संस्थेमार्फत संशोधनाचे काम करण्यात येत असून उक्त संस्थेचा अहवाल माहे डिसेंबर, २०१७ मध्ये शासनास सादर करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय.

(२) होय.

(३) टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेचा अंतिम अहवाल डिसेंबर, २०१७ मध्ये शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागांतर्गत असणाऱ्या विशेष शाळा व कर्मशाळा यांच्या अनुदानाबाबत

**(३२) * २८४८४ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत असणाऱ्या विशेष शाळा व कर्मशाळांना वेतन अनुदानाऐवजी सहाय्यक अनुदान मिळत असल्याने त्यांचे वेतन नियमित होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या अपंगांच्या संस्थांना १२ वर्षापासून कर्मचाऱ्यांची पदे मंजूर न होणे, १८ वर्षे पूर्ण केलेल्या विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी कर्मशाळा नसणे तसेच रिक्त होणाऱ्या विशेष शिक्षकांच्या पदांसाठी एनओसीची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) जुन्या अपंगाच्या संस्थांना त्या वेळी अस्तित्वात असलेल्या कर्मचारी आकृतीबंधाप्रमाणे पदे मंजूर करण्यात आलेली आहेत व त्या पदावरील कर्मचारी सद्य:स्थितीत कार्यरत आहेत. दिनांक १८/८/२००४ च्या शासन निर्णयाप्रमाणे सुधारीत कर्मचारी आकृतीबंध लागू करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे जुन्या संस्थांमधील सुधारीत आकृतीबंधाप्रमाणे काही पदे नव्याने मंजूर करावी लागतात व काही पदे अतिरिक्त करणेबाबतची कार्यवाही आयुक्तालय स्तरावरुन सुरु आहे.

तसेच या बाबतीत काही संस्थांची न्यायालयीन प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या आदेशाप्रमाणे बंद पडलेल्या शाळेतील कर्मचाऱ्यांची प्रतिक्षा यादी आयुक्तालय स्तरावर सुरु असून त्यामधून जस जशी पदे रिक्त होतील त्या पदावर प्रतिक्षा यादीतील कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यात येत आहे. त्यामुळे रिक्त पदे भरताना एनओसी घेणे आवश्यक आहे.

तसेच १८ वर्षे पूर्ण केलेल्या विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी कर्मशाळा नसणे, हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती मधील व्यापारी शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या कांद्यावर दोन टक्के उचल घेतल्याबाबत**

**(३३) * २७६४९ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांकडून अडत कापून घेण्यास बंदी असताना सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा व्यापाऱ्यांकडून दोन टक्के उचल घेतल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत तक्रार करण्यात येऊनही सोलापुर कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळुन आले आहे, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही.
तथापी, कांदा व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून उचल म्हणून २% पर्यंत रक्कम वसूल केल्याबाबतचे वृत्त दिनांक १६/०१/२०१७ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाले होते.
(२) व (३) स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली बातमी तसेच प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करून दोन अडतदारांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील सुवर्ण महोत्सवी वर्षात आदिवासी शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळण्याबाबत**

**(३४) * २८०२८ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील सुवर्ण महोत्सवी वर्षात आदिवासी शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या सुमारे सात हजार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास आयुक्तालयाचे संकेतस्थळावरील तांत्रिक अडचणीमुळे ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया धिम्यागतीने सुरु असून अर्ज भरतांना चुकीच्या नोंदी झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या खात्यात जमा होणे व सदर संकेतस्थळ पूर्ण क्षमतेने कार्यरत राहण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) व (२) शिष्यवृत्ती वितरणामधील अनियमितता टाळण्याच्या अनुषंगाने सन २०१५-१६ पासून सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी ई-विकास ऑनलाईन संगणकीय प्रणालीमार्फत सुरू करण्यात आलेली आहे. तथापि, सदर प्रणाली विकसित केलेल्या कंपनीचा सर्व्हिस कालावधी संपुष्टात आल्याने त्यांनी तांत्रिक सपोर्ट काढून घेतला. सबब, २०१५-१६ मधील शिष्यवृत्ती अर्ज पडताळणीकरीता तांत्रिक समस्या उद्भवल्याने काही प्रमाणात शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित राहीले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
(३) विद्यार्थी/पालक यांच्या बँक खात्यावर ऑनलाईन पद्धतीनेच शिष्यवृत्तीचा लाभ देण्याविषयी शासनाचे धोरण असल्याने सदर तांत्रिक अडचणी सोडविण्याकरीता आवश्यक तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून घेण्यात आले आहे. तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत सर्व विभागांकरीता सर्व समावेशक ई-शिष्यवृत्ती संगणकीय प्रणाली विकसित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठात चार वसतिगृहे उभारण्याबाबत

**(३५) * २९२२२ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागाकडून मुंबई विद्यापीठात चार वसतिगृहे उभारण्यासाठी केंद्र शासनाने दिलेला रुपये १ कोटी ८० लाखांचा निधी मागील वर्षापासून पडून असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील वसतिगृहाचे बांधकाम करण्यासाठी महापालिकेकडून आवश्यक असणारे ना हरकत प्रमाणपत्र संबंधित कंत्राटदाराला मिळालेले नसल्याने तसेच काही तांत्रिक अडचणींमुळे हे काम सुरु करण्यात आले नसल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) सदरील वसतिगृहाचे बांधकाम करण्यासाठी महापालिकेकडून परवानगी आणावयाचे काम वास्तुविशारदाकडे आहे. तथापि, संबंधित वास्तुविशारदाने बांधकाम परवानगी न आणल्याने काम सुरु करण्यात आलेले नाही.

-----------------

**परभणी जिल्हा देखरेख संघातील गैरप्रकाराची जबाबदारी निश्चित करणेबाबत**

**(३६) * २७८४५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २४४९२ ला दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी-हिंगोली जिल्हयातील गटसचिवांवर होत असलेल्या अन्यायाची चौकशी करणे तसेच परभणी जिल्हा देखरेख संघाने संस्थेच्या संपत्तीचा व अधिकाराचा दुरूपयोग करुन संस्थेचे आर्थिक नुकसान केल्याने संचालक मंडळावर जबाबदारी निश्चित करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, परभणी यांनी सहाय्यक निबंधक, गंगाखेड यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहाय्यक निबंधक यांनी विहित मुदतीत चौकशी अहवाल सादर केला आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अहवालाचे स्वरुप काय आहे, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८(१) अन्वये चौकशी अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक, परभणी यांचे दिनांक १५/७/२००८ रोजीच्या आदेशान्वये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था तालुका गंगाखेड यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे.

(२) चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाल विहीत मुदतीत सादर न करता दिनांक २५/३/२०११ रोजी सादर केलेला आहे.

(३) परभणी जिल्हा देखरेख सहकारी संघ यांचा पैसा प्रत्यक्षात वैयक्तिकरित्या वापरल्याचा किंवा अपहार झाल्याचे किंवा वैयक्तिक अपयोजन केल्याचे सिध्द होत नसल्यामुळे संबंधितांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८(१) नुसार वैयक्तिकरित्या जबाबदारी निश्चित करणे योग्य नसल्याचे चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवालात स्वयंस्पष्ट नमूद केल्यामुळे संचालक मंडळावर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, परभणी या कार्यालयाच्यावतीने कुठलीही वैधानिक कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून देण्यात आलेल्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती शुल्कात कोटयवधी रुपयांच्या गैरव्यवहाराबाबत**

**(३७) * २७३१६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक २३७४७ ला दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात आलेल्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती शुल्कात सुमारे बारा कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे शासनाने नेमलेल्या विशेष चौकशी पथकाने (टाक्स फोर्स) केलेल्या चौकशीत आळढून आल्याने संबंधित संस्थाचालकांविरुध्द गुन्हे दाखल करण्याचे व सदर रक्कम वसुल करण्याचे निर्देश आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार सदर संस्थाचालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) संबंधित संस्थाचालकांविरुध्द गुन्हे दाखल करण्याची व वसुलपात्र रक्कम वसूल करण्याची कार्यवाही आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बामणी (ता.हदगांव, जि.नांदेड) येथील शेतकऱ्याने आत्महत्या केल्याबाबत**

**(३८) * २९४४३ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बामणी (ता.हदगाव, जि.नांदेड) येथील शेतकऱ्याने महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून घेतलेल्या रुपये ५० हजाराचे कर्ज सतत तीन वर्षाच्या दुष्काळामुळे परत फेड करता न आल्याने व शेतीही कोरडवाहू असल्याने शेतीत कर्ज फेडण्याजोगे उत्पन्न न झाल्याने निराश होवून आत्महत्या केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांचे कर्ज माफ करुन त्यांच्या वारसदारांना शासनाकडून आर्थिक मदत देण्यात आली वा केंव्हापर्यंत देण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे खरे आहे. मौ.बामणी येथील शेतकरी बबन मारोती वटाणे (वय ५५ वर्षे) यांनी दिनांक १८/१/२०१७ रोजी दुपारी २ ते ३ च्या सुमारास स्वत:च्या शेतात सततची नापिकी व दुष्काळामुळे बँकेचे कर्ज कसे फेडावे या विवंचनेत विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली असल्याचे प्राथमिक अहवालाद्वारे निदर्शनास आले आहे.

(२) शेतकरी आत्महत्या प्रकरणात चौकशीअंती शासन निर्णय दिनांक २३/१/२००६ व दिनांक २७/२/२००६ नुसार जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत निर्णय होऊन पात्र ठरलेल्या प्रकरणात मयत शेतक-याच्या वारसास मदत देण्यात येते. त्यानुसार याप्रकरणीही जिल्हास्तरीय समितीमार्फत कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद शहरात महावितरणाची तीन हजार रोहीत्र (ट्रान्सफॉर्मर) धोकादायक अवस्थेत असल्याबाबत**

**(३९) * २९१६३ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात महावितरणाची तीन हजार रोहीत्र (ट्रान्सफॉर्मर) धोकादायक अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिक्षक अभियंत्यांनी धोकादायक रोहीत्र यंत्राची सफाई, दुरुस्ती व फेन्सिंग केल्याचा बोगस अहवाल मुख्य अभियंत्यांना सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे खरे नाही.

औरंगाबाद शहर मंडळ कार्यालयांतर्गत माहे सप्टेंबर, २०१६ व ऑक्टोबर, २०१६ मध्ये विशेष मोहिम राबवून महावितरण कर्मचाऱ्यांमार्फत औरंगाबाद शहरामधील ११६६ ठिकाणच्या रोहीत्रांच्या परिसरातील वाढलेले गवत काढून रोहित्र यार्डची स्वच्छता करण्यात आली. तसेच ६८ रोहित्रांच्या संरक्षक जाळी (फेन्सिंग), ४२ रोहित्रांच्या ओट्यांची दुरुस्ती व २४६ रोहित्रांच्या वितरण पेटीची देखभाल व दुरुस्ती करण्यात आली.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील साखर कारखान्यांनी कर्जाची रक्कम थकविल्याने राज्य सहकारी बँकेने सदर कारखाने विक्रीस काढल्याबाबत**

**(४०) * २६९०३ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ११ सहकारी साखर कारखान्यांनी सहाशे कोटी रुपयांचे कर्ज थकविल्याने राज्य सहकारी बँकेने कारखाने विक्रीस काढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणकोणत्या साखर कारखान्यांकडे किती कर्ज आहे तसेच थकित कर्ज फेडण्यासंदर्भात त्यांना नोटीस देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नोटीस देऊन देखील उक्त कारखान्यांनी कर्ज न फेडण्यामागची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.
(२) सदर ११ कारखान्यांकडील दिनांक ३०/११/२०१६ अखेरीस कर्ज येणेबाकीचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | मुद्दल | व्याज | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.गजानन ससाका लि. संभाजीनगर जि.बीड | २७८६.४५ | ३६४६.२४ | ६४३२.६९ |
| २ | जिजामाता ससाका लि. दुसरबीड ता.सिंदखेडराजा जि.बुलढाणा | २०२८.३३ | ५२५०.२३ | ७२७८.५६ |
| ३ | विनायक ससाका जि. परसोडा ता. वैजापूर जि.औरंगाबाद | १४८८.०० | ३४२७.६१ | ४९१५.६१ |
| ४ | देवगिरी ससाका गिरीजानगर ता.फुलंब्री जि.औरंगाबाद | १६४२.१७ | १५५६.७० | ३१९८.८७ |
| ५ | पांझराकान ससाका लि.भांडणे ता.साखरी जि.बीड | २१८०.५३ | ५०५५.७० | ७२३६.२३ |
| ६ | स.म.स्व.बापूरावजी देशमुख ससाका लि. वेळा ता.हिंगणघाट जि.वर्धा | ५०२४.७६ | ६५२०.७३ | १५५४५.४९ |
| ७ | प.डॉ.वि.वि.पाटील ससाका लि. अशोकनगर ता.केज जि.बीड | २०२८.५२ | ६४८२.८२ | ८४११.३४ |
| ८ | यशवंत ससाका लि. चितांमणीनगर थेऊर ता.हवेली, जि.पुणे | २४५१.३५ | १५१५.५४ | ३९६६.८९ |
| ९ | नगर तालुका ससाका लि.वाळकी, मु.पा.देऊळगांव सिध्दी ता.जि.अहमदनगर | १४४.२५ | ५९५.७८ | ७४०.०३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | जयजवान जयकिसान ससाका लि. नळेगांव ता.चाकोर जि.लातूर | २१४०.१४ | ४१०६.२७ | ६२२७.४६ |
| ११ | श्री.संतनाथ ससाका लि. तुळशीदास नगर ता.वैराग जि.सोलापूर | ९२७.३२ | २३३४.४८ | ३२६१.८० |
| | **एकुण** | २२८४१.८२ | ४०४९२.१० | ६३३३३.९२ |

उपरोक्त सर्व ११ साखर कारखान्यांना सेक्युरिटायझेशन कायदा २००२ मधील तरतुदीनुसार १३ (२) ची ६० दिवसाची नोटीस देण्यात आली. तथापि ६० दिवसाच्या कालावधीत संबंधित कारखान्यांनी वसुलीस प्रतिसाद दिला नाही. तसेच परतफेडी संदर्भात नियोजनही त्यांनी सादर केलेले नाही. त्यामुळे सरफेसी अंतर्गतच्या कलम १३ (४) ची जप्तीची नोटीस संबंधित कारखान्यांना दिली व जप्ती कायवाही पुर्ण केली आहे.

(३) सदर कारखाने आर्थिक नियोजन बिघडल्याने व गाळप क्षमतेचा वापर पुर्णत न करु शकल्याने बंद अवस्थेत पोहचले. तथापि, कारखान्यांनी कर्ज न फेडण्याची कारणे विविध आहेत. शासनाकडुन कारखान्यांची सद्यस्थिती लक्षात घेवुन काही संस्थांवर अवसायकाची नियुक्ती केली आहे. प्रामुख्याने बहुतांश प्रकरणात नाजुक आर्थिक स्थिती व गाळप क्षमतेचा पुर्ण वापर न होणे या कारणांमुळे कारखान्यांचे कर्जाची परतफेड होऊ शकली नाही.

-----------------

## ठाणे येथील आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांसाठी खरेदी करण्यात आलेल्या सामग्री खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४१) * २६८४५ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रामराव वडकुते, श्री.नारायण राणे, श्री.सुनिल तटकरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विभागांतर्गत आश्रमशाळांतील विद्यार्थीनींसाठी सन २०१६-१७ या वर्षासाठी टुथपेस्ट, साबण, तेल इत्यादी सामुग्री खरेदीकरीता निविदा काढण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हयातील १२० आश्रमशाळांना पुरवठा केलेल्या संस्थेचा भाव व बाजार भाव खरेदीमध्ये तफावत आढळून आली असून यामध्ये रुपये ११ कोटींचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) शासन निर्णय १०/०३/२०१६ मधील तरतुदीनुसार शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना टुथपेस्ट, साबण, तेल पुरविणेसाठी अपर आयुक्त, ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर यांचे स्तरावरुन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

(२) व (३) अपर आयुक्त, ठाणे अंतर्गत १२० शासकीय आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना साबण, खोबरेतेल, टूथपेस्ट, टूथब्रश, सॅनिटरी नॅपकिन, हॅन्डवॉश, सॅनिटायझर पुरविण्यासाठी अपर आयुक्त, ठाणे यांचे स्तरावरुन अंदाजे ११.६३ कोटी इतक्या रकमेची ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. प्रकरणी एकूण १० निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी कागदपत्रे तपासणीत ९ निविदाधारक पात्र ठरले. पात्र ९ पुरवठादारांपैकी न्युनतम दराच्या पुरवठादाराकडून खरेदी करण्याचे अपर आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील खरेदी समिती क्र.२ यांनी शिफारस केली आहे. अपर आयुक्त, ठाणे यांनी शिफारस केलेल्या अंघोळीचा साबण (निमाबाथ रु ९.३५), कपडे धुण्याचा साबण (संजिवन रु. ३.५१), भांडी धुण्याचा साबण (संजिवन रु. ३.८७), खोबरेल तेल (पॅरागॉन रु. १४.८५), सॅनिटरी नॅपकिन (शॉनी रेग्युलर रु. २१.०० ), टुथपेस्ट (पर्ल व्हाईट रु. २३.००), टूथ ब्रश (संजीवन रु. ५.४०) या वस्तू नामांकित (ब्रॅन्डेड) कंपन्यांच्या नसल्याने ते ब्रॅन्ड रद्द करून राज्यामध्ये सर्व अपर आयुक्त अंतर्गतच्या आश्रमशाळांसाठी एकसुत्रिपणा व समानता राहण्याच्या दृष्टीने व विद्यार्थ्यांना दर्जेदार ब्रन्डेड कंपन्याच्या वस्तु देण्यासाठी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी खालील शिफारस केलेल्या अंघोळीचा साबण (निरमा रु. १३.४१), कपडे धुण्याचा साबण (निरमा रु. ३.७८), भांडी धुण्याचा साबण (पतंजली रु. ४.९५), खोबरेल तेल (कोको केयर रु. २५.९०), सॅनिटरी नॅपकिन (स्टे फ्री रु. ३१.९०), टुथपेस्ट (प्रॉमिस रु. २२.९०) या ब्रॅन्डेड वस्तुंच्या पुरवठादारास मान्यता देण्यात आली आहे.

वरील वस्तुंचे निविदाधारकांनी निविदेत दिलेल्या दरांची तुलना स्थानिक बाजार भावाशी करून सदर दर बाजार भावापेक्षा कमी असल्याची खात्री केलेली आहे. सदर प्रकरणी कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पाळा (ता.खामगाव, जि.बुलडाणा) आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यींच्या सुरक्षेसाठी महिला अधिक्षकांची पदे भरणे व सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्याबाबत**

**(४२) * २८९२२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुभाष झांबड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाळा (ता.खामगाव, जि.बुलढाणा) येथील मुलींच्या आश्रमशाळेत विद्यार्थीनीवर झालेल्या बलात्काराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व आश्रमशाळेत महिला अधिक्षक, परिचारीका नियुक्त करणे व सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्याबाबतच्या सूचना शासनाने दिल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या जिल्हयात मुलींच्या शासकीय आश्रमशाळा आहेत तेथे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी दर तीन महिन्यांतून एकदा सर्व आश्रमशाळांची प्रत्यक्ष जाऊन तपासणी करण्याचे निर्देश शासनाने दिले असून त्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत उक्त शाळांना भेटी दिल्या जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समाजकल्याण विभागाकडून सीसीटिव्ही कॅमेरे बसविणे व सर्वच आश्रमशाळांमध्ये महिला अधिक्षक व परिचारीका यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

आदिवासी विकास विभागाने राज्यातील सर्व सर्व शासकिय व अनुदानित आश्रमशाळांमधील स्त्री अधिक्षकांची पदे भरण्याच्या सूचना शासन निर्णय दिनांक १७/१२/२०१६ व दिनांक १९/१२/२०१६ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत. तसेच शासकीय आश्रमशाळेमध्ये आवश्यकतेनुसार सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्याबाबतच्या सूचनाही संबंधितांना वेळोवेळी बैठकीत चर्चेच्या वेळी देण्यात आलेल्या आहेत.

(२) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दिनांक १८/११/२०१६ अन्वये आदिवासी विकास विभागाच्या सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची तपासणी जिल्ह्यातील महसूल, महाराष्ट्र विकास सेवा पोलीस व आदिवासी विकास विभागातील महिला अधिका-यांमार्फत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(३) जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेमार्फत गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत सामाजिक न्याय विभागाच्या आश्रमशाळांची तपासणीचे वेळी संबंधित मुख्याध्यापक यांना सीसीटिव्ही कॅमेरे लावण्याबाबतच्या सुचना समितीकडून देण्यात आलेल्या आहेत. तथापि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून त्या विभागातंर्गत असलेल्या विजाभज आश्रमशाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत स्वतंत्रपणे निर्देश दिलेले नाहीत. तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १४/१/२०११ अन्वये विजाभज आश्रमशाळांमध्ये महिला वसतिगृह अधिक्षिकांची २८२ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूरातील वीज ग्राहकांना एस.एन.डी.एल. कंपनाने नविन विद्युत मीटरचा पुरवठा करण्याबाबत

**(४३) * २८८०३ श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नियमानुसार नविन विद्युत मीटरची मागणी करुन बराच कालावधी होऊनही नागपूरातील ग्राहकांना एस.एन.डी.एल. कंपनीने नविन विद्युत मीटरचा पुरवठा केला नसल्याचे दिनांक २२ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर शहरातील मानेवाडा परिसरातील एका ग्राहकाने दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी नविन मीटर करीता मागणी पत्र दिले, परंतु दिनांक २९ ऑक्टोंबर, २०१६ पर्यंत नविन विद्युत मीटर देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या शिफारशीनुसार मागणी पत्र दिल्यानंतर १५ दिवसात ग्राहकाला विद्युत मीटर मिळाले नाही तर विद्युत कंपनीला दंडाची तरतूद आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १५ दिवासांपेक्षा जास्त कालावधी होऊनही ग्राहकाला विद्युत मीटर न पुरविल्या प्रकरणी एस.एन.डी.एल. कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कृती मानकानुसार ३० दिवसात विद्युत मीटर मिळाले नाही तर दंडाची तरतूद आहे.

(४) मानेवाडा परिसरात प्राप्त झालेल्या १४ अर्जांपैकी ०२ प्रकरणांमध्ये ३० दिवसांच्या आत वीज पुरवठा देण्यात आला. उर्वरित ११ प्रकरणांमध्ये ३० दिवसानंतर वीज पुरवठा देण्यात आला. परंतु सदरहू विलंब ग्राहकांद्वारे विद्युत संच मांडणी न झाल्यामुळे किंवा ग्राहकांच्या इतर कारणांमुळे झालेला होता.

तथापि, ग्राहकांनी योग्य प्रकारे विद्युत संच मांडणी केल्यानंतर व आवश्यक त्या कागदपत्रांची परिपुर्तता केल्यानंतर त्वरीत ग्राहकांचा वीज पुरवठा सुरु करण्यात आला. एका प्रकरणामध्ये ग्राहकाकडून अजूनही विद्युत संच मांडणी न झाल्यामुळे वीज पुरवठा प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून संस्थांना थेट कर्ज पुरवठा करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(४४) * २७४२२ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २६०८१ ला दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून विविध कार्यकारी सेवा संस्थांना थेट कर्ज पुरवठा करण्याच्या विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्याचे स्वरुप काय आहे, तसेच या निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनुसूचित जाती/नवबौध्द विद्यार्थ्यांना**
**मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती देण्याबाबत**

**(४५) * २८७०८ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: औरंगाबाद, जालना, बीड, परभणी व नागपूर येथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय विभागांतर्गत देण्यात येणारी शिष्यवृत्तीची रक्कम मागील तीन वर्षापासून मिळाली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्रतीवर्षी रुपये १२०० कोटी इतका निधी देण्यात येत असून यावर्षाकरीता केवळ रुपये ५२५ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली आहे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिष्यवृत्तीसाठी व फ्रिशिपसाठी सुमारे १५ लाख ८ हजार २५० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरले असून सन २०१६-१७ या वर्षासाठी एकूण ५ लाख ८० हजार २८९ विद्यार्थ्यांपैकी केवळ १ लाख १९ हजार ७८९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व परीक्षा शुल्क अदा केले असल्याने अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना नियमित शिष्यवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.
(२) अशंत:खरे आहे.
(३) व (४) सन २०१६-१७ करीता शिष्यवृत्ती व फ्रि-शीपसाठी एकूण १६,५३,८७० प्राप्त अर्जापैकी ७,९३,३०७ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. उर्वरीत अर्ज महाविद्यालयांकडून जिल्हापातळीवर सादर करण्याची तसेच जिल्हा पातळीवर प्रलंबित अर्जाची तपासणी सुरु असुन, पात्र विद्यार्थी शिष्यवृत्ती व फ्रि-शीप पासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील तूर उत्पादक शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत देणे तसेच खरेदी केंद्रावरील त्रास देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४६) * २७५९० श्री.नारायण राणे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र शासनाने चालू हंगामासाठी रुपये ५०५० प्रति क्विंटल हमीभाव जाहीर केला असला तरी या हंगामात लागवड झालेली तूर बाजारात विक्रीसाठी येताच बाजारातील दर प्रति क्विंटल रुपये ४००० पर्यंत खाली आल्याने तूर उत्पादक शेतकऱ्यांना ५०० ते १००० रुपयांनी नुकसान सहन करावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यात तूर खरेदीसाठी २७,५९० खरेदी केंद्र सुरु करण्यात आले असले तरी नांदेड कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत नाफेडकडून खरेदी केंद्राच्या नियमातील जाचक अटी व मोबदला वेळेत न मिळणे, तूर ओली असल्याचे सांगून अधिकारी व कर्मचारी यांचेकडून होणार त्रास व बीड बाजार समितीतील खरेदी केंद्रातील हमालांकडून शेतकऱ्यांची तूर काढून घेणे अशाच प्रकारे राज्यातील अनेक खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांना होणाऱ्या त्रासाबाबत तक्रार करुनही संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील वर्षाच्या तुलनेत चणा, तूर, मूग, उडीदाचे अधिक उत्पादन होऊनही चालू वर्षी किमान आधारभूत किंमतीनुसार खरेदी न केल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरुन त्यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खरेदी केंद्राचे नियम शिथिल करणे, मालाचा मोबदला वेळेत देणे, शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या खरेदी केंद्रावरील अधिकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे तसेच तूरीच्या भावावर नियंत्रण ठेवण्यासाठी तूर बाजारात येण्यापुर्वी शासकीय खरेदीची कार्यवाही पुर्ण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अशंत: खरे आहे.

केंद्र शासनाने हंगाम २०१६-१७ साठी जाहिर केलेल्या आधारभूत किंमतीमध्ये तूरीसाठी रुपये ४६०० + ५४० बोनस असे मिळून रुपये ५०५०/- इतका हमीभाव

FAQ प्रतीच्या मालासाठी जाहिर केला आहे. Non-FAQ तूरीला रुपये ३८०० ते रुपये ४३०० इतका बाजारभाव मिळत आहे.

(२) राज्यात तूर खरेदी नाफेड, एफसीआय व एसएफएसी या केंद्रीय संस्थांच्यावतीने पणन महासंघ, विदर्भ पणन महासंघ व महाएफपीसी या संस्थांमार्फत सुरु आहे.

सुरु असलेल्या खरेदी केंद्रांवर MSP अंतर्गत विहित केलेल्या Specification नुसार FAQ दर्जाच्या तूरीची खरेदी केली जात आहे.

खरेदी केंद्रावर प्राप्त तक्रारींचे वेळीच निरसन करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

(३) व (४) नाही.

मूग व तूरीच्या आवकेमुळे दर कोसळून घसरलेल्या दरामुळे शेतकऱ्यांचे नूकसान होऊ नये यासाठी राज्यात किमान आधारभूत किंमतीने मूगाची खरेदी दिनांक १/९/२०१६ पासून सुरु केली होती. तसेच भाव स्थिरता निधी योजनेंतर्गत उडीदाची खुल्या बाजारभावाने दिनांक १५/९/२०१६ पासून खरेदी सुरु केली होती. सध्या तूरीची खरेदी दिनांक १५ डिसेंबर, २०१७ पासून सुरु केली आहे. चना (हरभरा) साठी किमान आधारभूत किंमत रु. ४०००/- (रु.२०० बोनससह) असून सध्या बाजारात चना (हरभरा) ची आवक सुरु झाली असून, बाजारभाव रुपये ४९०० ते ५५०० च्या दरम्यान आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीबीदारुफळ व रानमसले (ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर) येथील वीज उपकेंद्र नियमित सुरु करण्याबाबत**

**(४७) * २८६२३ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीबीदारुफळ व रानमसले (ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर) येथे मागील वर्षी सुरु झालेल्या वीज उपकेंद्रात तांत्रिक दोष असल्याने नियमित वीज पुरवठा खंडीत होत असल्याने येथील शेतकऱ्यांनीच सदर वीज उपकेंद्रास कुलूप लावल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या उपकेंद्रातील तांत्रिक दोष दूर करणे तसेच यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

सन २०१५-२०१६ मध्ये सोलापूर जिल्हयात दुष्काळ सदृष्य परिस्थिती निर्माण झाल्यमुळे सदर भागातील भार कमी असल्याने बीबीदारुफळ उपकेंद्रातील ११ केव्हीचे दोन फिडर कार्यान्वित करण्यात आले. तथापि सन २०१६-२०१७ मध्ये सोलापूर जिल्हयात समाधानकारक पाऊस झाला. सोलापूर जिल्हा हा रब्बी जिल्हा असल्याने माहे जानेवारी, २०१७ व त्यादरम्यान वीजेच्या मागणीत वाढ झाली. त्यामुळे बीबीदारुफळ उपकेंद्रातील रानमसले फिडरचा लोड जास्त असल्याने फिडर ट्रिप होऊ लागले. या कारणाने सदर भागातील सुमारे ५० ते ६० शेतकऱ्यांचा जमाव दिनांक १५/०१/२०१७ रोजी बीबीदारुफळ उपकेंद्रावर जमा झाला व पुर्ण उपकेंद्र बंद ठेवण्याची मागणी केली. शेतकऱ्यांनी उपकेंद्रास कुलुप लावले नाही. परंतु वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली होती.

(२) दिनांक १६/०१/२०१७ रोजी बीबीदारुफळ उपकेंद्रातील तिसरा फिडर त्वरित चालू करण्यात आला व रानमसले फिडरवरील भार कमी करण्यात आला. सद्यस्थितीत बीबीदारुफळ उपकेंद्रामधून वीज पुरवठा सुरळीतपणे करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्याबाबत**

**(४८) * २७११४ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.तानाजी सावंत, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इयत्ता ११ वी, १२ वी आणि व्यवसायिक तसेच बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या, परंतु कोणत्याही शासकीय किंवा महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधांसाठी थेट अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेला दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मान्यता देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचे स्वरुप काय आहे, त्याचा लाभ केव्हापासून व किती विद्यार्थ्यांना होणार आहे,
(३) तसेच उक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी किती निधीची आवश्यकता आहे व प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) होय. दिनांक ०६ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना" ही योजना सुरु करण्यात आलेली आहे.
(२) अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश मिळालेला नाही, अशा विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक ती रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट उपलब्ध करण्यासाठी शासनाने "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना" ही योजना सुरु केलेली आहे. सन २०१६-१७ या वर्षात अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गाच्या १५००० विद्यार्थ्यांना आणि सन २०१७-१८ पासून २५००० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) सदर योजनेची अंमलबजावणी २०१६-२०१७ या आर्थिक वर्षापासून करण्यात येणार आहे. त्यासाठी सन २०१६-१७ या वर्षाकरिता रुपये ८१,४०,५९,०००/- इतक्या निधीची आवश्यकता आहे व सदर निधी उपलब्ध करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासनाने जागतिक व्यापार केंद्राकरीता वितरण केलेल्या जमिनीच्या झालेल्या दुरुपयोगाबाबत**

**(४९) * २६७८२ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाकडून जागतिक व्यापार केंद्राकरीता काही अटी व शर्तीवर जमिनीचे व्यापार, औद्योगिक प्रदर्शने तसेच व्यापार वाढवणे याकरीता वितरण करण्यात आले असून यासंदर्भातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी लीज कराराचे उल्लंघन, वित्तीय अनियमितता तसेच मालमत्तेचा दुरुपयोग झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले, त्यानुसार संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२), (३) व (४) या प्रकरणी भाडेपट्टा कराराचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्याने जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी त्यांच्या दिनांक २४/११/२०१६ च्या आदेशान्वये एम. विश्वेश्वरय्या इंडस्ट्रीयल रिसर्च आणि डेव्हलपमेंट सेंटर यांना भाडेपट्टयाने दिलेली शासकीय जागा शासन जमा करुन घेण्यात येत असल्याचे आदेशित केले. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या उक्त आदेशाविरुध्द संबंधितांनी मा.उच्च न्यायालयात मुंबई येथे रिट पिटिशन (लॉजिंग) क्र.३१४१/२०१६ दाखल केले होते. या याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३०/११/२०१६ च्या आदेशान्वये, जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या दिनांक २४/११/२०१६ च्या आदेशा विरुध्द एका आठवडयात अपिल दाखल करुन महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे दाद मागण्याचे याचिकाकर्त्यांचे निवेदन मान्य करुन जिल्हाधिकारी यांच्या दिनांक २४/११/२०१६ रोजीच्या आदेशाच्या पूर्वीची स्थिती कायम ठेवण्याचे आदेशित केले. तद्नंतर याचिकाकर्त्याने सदर प्रकरणी मा.महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणात जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या दिनांक २४/११/२०१६ च्या आदेशाविरुध्द अपिल दाखल केले आहे.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) येथे जप्त करण्यात आलेल्या क्लोरल हायड्रेटच्या साठ्याबाबत**

**(५०) * २८०९१ श्री.जयंत पाटील, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या उत्पादन शुल्क विभागाच्या मुंबई भरारी पथकाने भिवंडी (जि.ठाणे) येथे छापा टाकून सुमारे रूपये १५ लाख ६७ हजार ५०० किंमतीचा क्लोरल हायड्रेट या विषारी पावडरचा साठा जप्त केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ताडीचे सेवन करणारी व्यक्ती संपूर्णपणे नशेच्या आहारी जावी म्हणून ही विषारी पावडर ताडीमध्ये मिसळली जाते तसेच सदर विषारी पावडरमुळे ताडी अधिक विषारी व जीवघेणी ठरते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) होय. हे खरे आहे.
(३) या गुन्हयात सात आरोपी असल्याचे निष्पन्न झाले असून आरोपींविरुध्द विष कायदा, १९१९ चे कलम २ व ६, महाराष्ट्र विष नियमावली १९७२ चे नियम ३ व १२ चे उल्लंघन झाल्यामुळे आणि महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ८१, ८३, ८६ व ९० अन्वये गुन्हा रजि. क्र.५११/१६ दिनांक ३१/१२/२०१६ रोजी नोंद केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे व शिष्यवृत्तीच्या निधीत वाढ करण्याबाबत

**(५१) * २६८८९ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विद्यार्थांच्या प्रोत्साहन व विकासासाठी शासनामार्फत शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अपंग विद्यार्थ्यांना अपंग शिष्यवृत्ती दिली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिष्यवृत्तीसाठी निधी अपूरा असल्याने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना दिली गेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१५-१६ ची शिष्यवृत्ती देणे व शिष्यवृत्तीच्या निधीत वाढ करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अपंग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०१५-१६ मध्ये पुरवणी मागणीद्वारे प्राप्त झालेल्या वाढीव निधीतून शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयात साखरेच्या उत्पादनातील संभाव्य घट आणि वायदे बाजारातील सट्टेबाजांची सक्रियता याबाबत कार्यवाही करण्याबाबत

**(५२) * २६९७५ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात साखरेच्या उत्पादनात चालू वर्षी येणारी संभाव्य घट लक्षात घेऊन वायदे बाजारात सट्टेबाजांची सक्रियता वाढल्याने साखरेचे भाव वाढत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी साखरेचे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) माहे डिसेंबर, २०१६ पासून बाजारातील साखरेचे भाव वाढल्याचे दिसून येते, हे खरे आहे. साखरेचे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ८/९/२०१६ च्या आदेशान्वये जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (चा १०) मधील कलम ३ व साखर नियंत्रण आदेश, १९६६ च्या खंड ५ नुसार साखर उत्पादकावर सप्टेंबर, २०१६ व ऑक्टोंबर, २०१६ या दोन महिन्याकरीता त्यांच्या वार्षिक उत्पादनाच्या अनुक्रमे ३७ टक्के व २४ टक्के मर्यादेपर्यंत साठामर्यादा लागू केली आहे.

तसेच, केंद्र शासनाच्या दिनांक २९ एप्रिल, २०१६ च्या अधिसूचनेन्वये निर्देशित केल्यानुसार जीवनावश्यक वस्तुंमध्ये समावेश असलेल्या “साखर” या बाबीवर जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ च्या कलम १ व कलम ३ मधील तरतूदीनुसार साखरेवर साठा मर्यादा लागू करण्याचे आदेश दिनांक २६ मे, २०१६ रोजीच्या राजपत्रात अधिसूचित केले आहे. या आदेशानुसार घाऊक व्यापाऱ्यांसाठी ५००० क्विंटल व किरकोळ व्यापाऱ्यांसाठी ५०० क्विंटल इतकी साठा मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. हा आदेश सप्टेंबर २०१६ पर्यंत लागू होता. या साठा मर्यादा आदेशाला केंद्र शासनाने दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ च्या अधिसूचनेद्वारे दिनांक २८ एप्रिल, २०१७ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

वरील आदेशानुसार राज्य शासनाने साखर उत्पादक तसेच किरकोळ व घाऊक व्यापारी यांचेकडील साखर साठा मर्यादित ठेवण्याबाबत दक्षता घेण्याच्या संबंधित यंत्रणांना सूचना दिल्या आहेत.

साखर उत्पादक संघाने मा.मुंबई उच्च न्यायालयात उत्पादकांवरील साठा मर्यादेच्या आदेशावर याचिकेद्वारे आव्हान दिले असून, सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

**विदर्भातील राष्ट्रीयकृत बँका ५० पैश्यांपेक्षा कमी असलेल्या कर्जाची वसुली करीत असल्याबाबत**

**(५३) * २६८६५ श्री.प्रकाश गजभिये, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चालू आर्थिक वर्षातील खरीप हंगामाची पैसेवारी ५० पैश्यांपेक्षा कमी असलेल्या गावांमधील शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीला शासनाने स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील शेतकऱ्यांकडे असलेल्या जुन्या नोटा शेतकऱ्यांनी बँकेत जमा केल्याने त्यांच्या जमा रक्कमेतून पीक कर्ज, तात्काळ कर्ज व शेतीसाठी संलग्नित कामाकरिता घेतलेल्या कर्जाचे हप्ते इत्यादी कर्ज वसुलीस शासनाने स्थगिती दिली असतांनाही राष्ट्रीयकृत बँका दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजीपासून परस्पर कर्ज वसूल करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.

(२) नाही.

अशा आशयाच्या कोणत्याही तक्रारी अमरावती व नागपूर विभागातील क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील फुलवडे (ता.आंबेगाव), वडेश्वर (ता.मावळ) व कोळेवाडी (ता.जुन्नर) येथील आश्रमशाळेत गैरप्रकार सुरु असल्याबाबत**

**(५४) * २७४९४ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील फुलवडे (ता.आंबेगाव), वडेश्वर (ता.मावळ) व कोळेवाडी (ता.जुन्नर) येथील आश्रमशाळेत गैरप्रकार झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा प्रशासनाने सदर आश्रमशाळांच्या गैरप्रकाराबाबतचा प्रस्ताव दिनांक १० जानेवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास आदिवासी विभागाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर आश्रमशाळा प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) जिल्हाधिकारी, पुणे यांनी जिल्ह्यातील महसूल, महाराष्ट्र विकास सेवा, पोलीस आणि आदिवासी विकास विभागातील महिला अधिकाऱ्यांमार्फत पुणे जिल्ह्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांच्या केलेल्या तपासणीच्या अहवालात शासकीय आश्रमशाळा वडेश्वर, ता.मावळ, अनुदानित आश्रमशाळा ता.जुन्नर व फुलवडे, ता.आंबेगाव या आश्रमशाळांमध्ये भौतिक सोयी-सुविधांबाबत त्रुटी निदर्शनास आल्या आहेत. तसेच वडेश्वर येथील आश्रमशाळेत प्राथमिक शिक्षिकेने एका विद्यार्थीनीसोबत गैरवर्तन केल्याबद्दल तक्रार होती.

(२) होय. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून प्राप्त शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तपासणी अहवाल आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना सादर करण्यात आला आहे.

(३) शासकीय आश्रमशाळा वडेश्वर, ता.मावळ या शाळेची सखोल तपासणी करण्याच्या सूचना प्रकल्प अधिकारी, जव्हार यांना दिनांक २३/०१/२०१७ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आल्या होत्या. यासंदर्भात प्रकल्प अधिकारी, जव्हार यांनी दिनांक ०१ मार्च, २०१७ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार विद्यार्थीनीने

केलेल्या गैरवर्तनाच्या तक्रारीत तथ्य नसल्याचे आढळून आले आहे. अनुदान निर्धारण पथकाने फुलवडे अनुदानित आश्रमशाळेस भेट दिली असता विद्यार्थ्यांनी भोजन, निवासव्यवस्था व लेखनसामुग्री याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने व समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार सदर आश्रमशाळेचे अनुदान रोखून ठेवण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आदिवासी विकास विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना मुलभूत सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५५) * २८३०४ श्री.हरिसिंग राठोड, श्री.कपिल पाटील, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या शासकीय ५४७ आश्रमशाळांमध्ये १.८७ आणि अनुदानित ५५६ आश्रमशाळांमध्ये २.१० लाख विद्यार्थी शिकत असून तेथे संरक्षक भिंत, निवास, पाण्याचा अभाव, निकृष्ठ भोजन, झोपण्यासाठी गाद्या नसणे, रेनकोट व स्वेटर नियमित न मिळणे, स्वच्छतागृहे व शौचालय उपलब्ध नसल्याने पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना ऐन थंडीत सकाळी ओढ्यावरील थंड पाण्याने आंघोळ करीत असल्याचे तसेच आवश्यक त्या मुलभूत सोयीसुविधा पुरविल्या जात नसल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने शाळांची तपासणी करून दोषींवर कारवाई करणे व विद्यार्थ्यांना मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) राज्यात एकूण ५५२ शासकीय आश्रमशाळा असून त्यापैकी ५२९ आश्रमशाळा सुरू आहेत. सदर आश्रमशाळेत १,८७,३९२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सद्यस्थितीत १८८ शासकीय आश्रमशाळांच्या इमारतीचे बांधकाम सुरू असून अक्कलकुवा व धडगाव या दुर्गम भागातील ९ शासकीय आश्रमशाळांच्या ठिकाणी फायबरशेडचे बांधकाम करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. ५५२ शासकीय आश्रमशाळांपैकी ३६८ ठिकाणी कायमस्वरूपी व १४९ ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपाची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच मुलांकरिता ३९२७ व मुलींकरिता ३८२३ असे एकूण ७७५० शौचालय

उपलब्ध असून ३२४ आश्रमशाळांना संरक्षक भिंत आहे. तसेच ८२ आश्रमशाळांच्या संरक्षण भितींच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्याची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहे यांचे बांधकाम आणि देखभाल-दुरूस्तीसाठी आदिवासी विकास विभागांतर्गत स्वतंत्र बांधकाम व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. ज्या आश्रमशाळांना दुरूस्तीकरणे आवश्यक आहे. अशा आश्रमशाळांची दुरूस्तीची अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता घेवून शाळेची दुरूस्ती करण्याची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच तातडीच्या दुरूस्तीसाठी रू.१.०० लक्ष पर्यंतची मुख्याध्यापकांना अधिकार देण्यात आले आहेत.

प्रत्येक आश्रमशाळेत भोजन समिती स्थापन करण्यात आलेली असून विद्यार्थ्यांकरिता बनविण्यात आलेल्या भोजनाची समितीकडून चव घेण्यात येवून त्याबाबतची नोंद रजिस्टरमध्ये नियमित घेण्यात येते. तसेच टाटा ट्रस्ट यांच्या सहकार्याने मुंढेगाव, ता. इगतपूरी, जि. नाशिक व कांबळगाव ता. जि. पालघर येथे मध्यवर्ती स्वंयपाकगृह योजना राबविण्यात येत असून त्या मार्फत ४० आश्रमशाळांतील १७,००० विद्यार्थ्यांना सकस आहार पुरविण्यात येत आहे. दर करारावर क्वायर मॅट्रेस खरेदीस मान्यता देण्यात आली असून त्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. तसेच निवासी विद्यार्थ्यांना रेनकोट पुरवठा करण्यात आलेला आहे. तर स्वेटर खरेदीसाठी ज्या विद्यार्थी/पालक यांचे बँक खाते उघडण्यात आलेले होते. अशा १,५३,७६२ विद्यार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्यात आली असून विद्यार्थ्यांनी स्वेटर खरेदी केलेले आहेत. उर्वरित विद्यार्थ्यांचे बँक खाते उघडण्याची कार्यवाही सुरू आहे.

पालघर जिल्ह्यातील जव्हार व डहाणू आदिवासी विकास प्रकल्प कार्यान्वित असून सदर प्रकल्पांतर्गत ६३ शासकीय आश्रमशाळा व ३८ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. ३९ शासकीय आश्रमशाळांच्या ठिकाणी इमारत बांधकामांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली असून ७ शाळांची बांधकामे पुर्ण होऊन हस्तांतरीत झालेली आहेत. ११ आश्रमशाळांचे काम पूर्णत्वांच्या मार्गावर असून ९ आश्रमशाळांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे व १२ आश्रमशाळांचे बांधकाम तांत्रिक अडचणीमुळे सुरू झालेले नाही. ६३ शासकीय आश्रमशाळांच्या विद्यार्थ्यांसाठी ९९ व विद्यार्थीनीसाठी १११ स्नानगृहे तर विद्यार्थ्यांसाठी १०५ व विद्यार्थीनीसाठी ९९ स्वच्छालय उपलब्ध आहेत.

पालघर जिल्हयातील दाभोसा, शासकीय आश्रमशाळेतील सोलर वॉटर हिटर बंद असल्याने विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी गॅस वर पाणी गरम करून देण्यात येते.

राज्यात एकूण ५५६ अनुदानित आश्रमशाळा स्वयंसेवा संस्थेमार्फत चालविल्या जात असून सदर आश्रमशाळांमध्ये एकूण २,५६,०२६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर संस्थाना प्रति विद्यार्थी/प्रति माह रू.९००/- परिरक्षण अनुदान शासनामार्फत अदा करण्यात येते. त्यानुषंगाने संस्थामार्फत विद्यार्थ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करू दिल्या जातात. सदर आश्रमशाळांची तपासणी करतांना काही त्रुटी आढळून आल्या आहेत.

टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या माध्यमातून शासकीय/अनुदानित आश्रमशाळांतील सोयी सुविधांची पाहणी करण्यात आली होती. त्यानुसार शाळांचे अ, ब, क, ड, वर्गीकरण करण्यात आले होते. तेथील क व ड वर्गातील अनुदानित आश्रमशाळांना दर्जा सुधारणा करण्याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या आहेत तसेच शासकीय आश्रमशाळामधील क व ड वर्गातील शाळामधील त्रुटीची पुर्तता करण्याबाबत प्रकल्प अधिकारी यांना सक्त सूचना देवून सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी पाठपूरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**एम.आय.डी.सी. बुटीबोरी (जि.नागपूर) परिसरातील अधिगृहीत केलेल्या जमिनीवर उद्योग सुरु न करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(५६) * २६७९८ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एम.आय.डी.सी. बुटीबोरी (जि.नागपूर) परिसरात शासनाने सन १९९० मध्ये शेतकऱ्यांची २४२८.१४ हेक्टर जमीन अधिगृहीत करून सदर भूखंड उद्योजकांना देण्यांत येवूनही अनेक भूखंडावर उद्योग उभारण्यांत आले नसल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्योजक भूंखडाची तात्पुरती बी.सी.सी. करून प्लॉटची जादा दराने विक्री करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भूखंड विक्री करणा-या उद्योजकांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) अंशत: खरे आहे.

संपादित क्षेत्रामध्ये महामंडळाने विविध आकारमानाचे १४४४ भूखंडाचे आरेखन करुन १२८९ भूखंड उद्योजकांना वाटप केले आहेत. त्यापैकी ६१६ भूखंडावर उत्पादन सुरु आहे. १९७ भूखंड उत्पादन सुरु होऊन बंद पडलेले आहेत. विकास कालावधीमध्ये २३४ भूखंडावर बांधकाम सुरु आहे. वाटप केलेल्या भूखंडावरील विकास कालावधी समाप्त झालेल्या भूखंडावर भूखंडाचा विकास केलेला नाही अथवा विकास करण्याकरीता परिणामकारक कार्यवाही केलेली नाही असे भूखंड परत घेण्याबाबत महामंडळाकडून कारवाई सुरु असून आजमितीस ३ भूखंड उद्योजकाकडून परत घेण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

ज्या भूखंडधारक उद्योजक महामंडळाच्या धोरणानुसार भूखंड हस्तांतरण करण्याची परवानगी मागतात. त्यानुसार भूखंड हस्तांतरण करण्याबाबत महामंडळाच्या निकषामध्ये भूखंड येत असल्यास बांधकामावर आधारित १०% किंवा ३०% हस्तांतरण शुल्क भरणा करुन भूखंडांचे हस्तांतरण करण्याचे धोरण आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिरसाव (ता.परंडा, जि.उस्मानाबाद) येथील श्री ॲग्रो कार्पोरेशन या कंपनीने विक्री केलेली किटकनाशके भेसळयुक्त असल्याबाबत

**(५७) * २९१६५ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरसाव (ता.परंडा, जि.उस्मानाबाद) येथील श्री.हनुमंत रामहरी चोबे यांनी माहे जुलै, २०१६ मध्ये श्री ॲग्रो कार्पोरेशन या कंपनीकडून दीड लाख रुपयांची खरेदी केलेली १२० लिटर श्री मोनो (मोनोकोटोफॉम ३६ टक्के) किटकनाशके भेसळयुक्त असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी श्री. चोबे यांना बोगस किटकनाशक देऊन फसवणूक केल्याप्रकरणी श्री ॲगो कार्पोरेशन या कंपनीकडून नुकसान भरपाई मिळण्याबाबत मा.सहकार मंत्री व स्थानिक पोलीस स्टेशन ठाण्यामध्ये तक्रारी करुनही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषी कंपनीविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) नाही.

(२) नाही.

(३) यासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने यशराज ॲग्रो प्रोडक्ट ॲण्ड रिसर्च सेंटर वराडे ता. कराड यांनी उत्पादीत केलेल्या व श्री ॲग्रो कार्पोरेशन पुणे यांचेकडून मार्केटींग झालेल्या मोनोक्रोटोफॅास ३६ टक्के या किटकनाशकाचे दोन नमुने ज्योर्तिलिंग कृषी सेवा केंद्र सिरसाव ता.परंडा या कृषी निविष्ठा केंद्रातून घेऊन ते तपासणीसाठी किटकनाशक चाचणी प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आलेले होते. सदर नमुने प्रमाणित असल्याचे अहवाल प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे कंपनीवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहांवर कायमस्वरुपी गृहपालांची नियुक्ती करण्याबाबत

**(५८) * २७४१४ श्री.जयवंतराव जाधव, श्री.कपिल पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक २४६२४ ला दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्ताने राज्यातील मागासवर्गीय मुलींच्या शिक्षणाकरिता सुरु करण्यात आलेल्या ५० वसतिगृहांवर गृहपालांची नियुक्ती न केल्यामुळे मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नियमित १६७ वसतिगृहांमधील गृहपालांची पदे रिक्त असल्यामुळे मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मुलींच्या वसतिगृहावर २४ तास महिला गृहपालांची नेमणूक करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे. सदर वसतिगृहांसाठी आवश्यक गृहपाल व इतर नियमित पदांना अंतिम मान्यता अद्याप मिळाली नसल्याने सदरहू पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सुरु असलेल्या जुन्या शासकीय वसतिगृहांपैकी काही वसतिगृहांतील गृहपालांची पदे रिक्त आहेत. तथापि सदर वसतिगृहांचा कार्यभार नजिकच्या वसतिगृहातील गृहपालांकडे सोपविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील बंद उद्योगांच्या जमिनींची तपशिलवार माहिती मिळण्याबाबत

**(५९) * २६७६८ श्री.संजय दत्त, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उद्योग विभागाद्वारे राज्यातील एम.आय.डी.सी. मध्ये बंद असलेले उद्योग तसेच ज्या कामासाठी एम.आय.डी.सी. मधील जमीन दिली तो उद्देश पुर्ण झाला नसल्यास सदर जमीन उद्योग विभाग ताब्यात घेणार असल्याची घोषणा करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील बंद असलेल्या एमआयडीसींमधील उद्योगांच्या शासनाने ताब्यात घेतलेल्या जमिनींचा संपूर्ण तपशील काय आहे,
(३) असल्यास, राज्यातील एमआयडीसी संदर्भात उद्योग धोरण आखून नविन उद्योग सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) व (२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने एमआयडीसी डिस्पोजल ऑफ लँड रेग्युलेशन- १९७५ मधील तरतुदीनुसार औद्योगिक क्षेत्रात वाटप केलेल्या ज्या भूखंड भूखंडधारकाने करारनाम्याच्या तरतुदीनुसार विहित कालावधीत / वाढीव कालावधीत विकसित केले नाहीत असे मोकळे भूखंड परत घेण्याची कार्यवाही महामंडळाकडून करण्यात येत आहे. महामंडळाने या अनुषंगाने एप्रिल-२०१६ पर्यन्त एकूण १४७४ भूखंड, क्षेत्र ७६४.७९९ हे.आर जमीन महामंडळाने ताब्यात घेतली आहे.

(३) महामंडळाने ताब्यात घेतलेल्या भूखंडांचे विहीत प्रक्रियाचा अवलंब करुन उद्योजकांना वाटप करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वडद (जि.वर्धा) येथील शेतकऱ्याच्या विहिरीवरील पंपाला वीज जोडणी मिळत नसल्याबाबत**

**(६०) * २८०२९ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडद (जि.वर्धा) येथील शेतकरी श्री. माणिक राजाराम गेडाम यांनी कोणतेही कर्ज न घेता स्व-कष्टाने खोदलेल्या विहिरीवरील पंपाला वीज जोडणी मिळावी याकरिता देवळी येथील महावितरण कार्यालयात दिनांक २४ फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास रक्कमेचा भरणा करुनही वीज जोडणी देण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. गेडाम यांना वीज जोडणी न मिळण्याची व वीज जोडणी मिळण्यास इतका विलंब लागण्याची कारणे आहेत,

(३) असल्यास, दोन वर्षे उलटूनही वीज जोडणी न देणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व श्री.गेडाम यांना कधीपर्यंत वीज जोडणी देण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) तहसिलदार, वर्धा यांनी दिनांक २३/०४/२०१५ रोजी श्री. गेडाम यांना वहिवाटीच्या रस्त्यात बांधलेली विहीर ताबडतोब बुजवून वहिवाटीचा रस्ता मोकळा करण्याबाबत आदेश दिले आहेत. सदर विहीरीवर श्री. गेडाम यांनी कृषीपंपाला विद्युत पुरवठयाची मागणी केली होती. तथापि, त्यांच्या अनधिकृत विहीरीवर विद्युत पुरवठा देण्यात आला नाही.

तहसिलदार, वर्धा यांनी सदर विहीर बुजविण्याचा आदेश दिल्यामुळे श्री. गेडाम यांचा कृषीपंप विद्युत पुरवठयाचा ए-१ अर्ज सहाय्यक अभियंता, देवळी ग्रामीण यांनी रद्द केलेला आहे.

(३) सदर प्रकरणात श्री. माणिक गेडाम यांनी अनधिकृत विहीरीवर विद्युत पुरवठयाची मागणी केलेली असल्यामुळे सदर विहीरीवर वीज पुरवठा देण्यात आलेला नाही. त्यामुळे महावितरणचे अधिकारी व कर्मचारी दोषी आढळत नाही.

(४) सदर विहीर अनधिकृत असल्याचे आदेश तहसिलदार, वर्धा यांनी दिल्यामुळे श्री.गेडाम यांचा कृषीपंप वीजपुरवठ्याचा ए-१ अर्ज सहाय्यक अभियंता, देवळी ग्रामीण यांनी रद्द केलेला आहे.

-----------------

## राज्यात जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती सुलभ करण्याबाबत

**(६१) * २७३२९ श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक १९३०८ ला दिनांक २२ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शैक्षणिक प्रवेशासाठी व शासकीय-निमशासकीय नोक-यांसाठी आवश्यक असणारे जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यास अनेक अडचणी येत असल्याने तसेच शासकीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती रोखल्या जात असल्याने सुमारे ८० हजार प्रलंबित प्रकरणांचा निर्णय होण्यासंदर्भातील निवेदन संस्थापक, जागृत नागरीक मंच, नागपूर यांनी दिनांक १९ ते २५ डिसेंबर, २०१६ या कालावधीत प्रसिध्द केले असून त्याची प्रत दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने माधुरी पाटील विरुध्द अन्य या खटल्यात दिलेल्या निकालानुसार सदर प्रमाणपत्रे देण्याची कार्यवाही करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्याच्या पध्दतीत बदल करुन सुधारीत कार्यपध्दतीनुसार प्रमाणपत्रे देण्याचा प्रस्ताव माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणता निर्णय घेतला आहे, त्याचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ नुसार जात पडताळणी नियम २०१२ विहित करण्यात आले आहेत. या नियमांनुसार जात प्रमाणपत्र देणे व त्याच्या पडताळणीचे कामकाज चालते.
(३) व (४) या विभागाच्या दिनांक १/४/२०१६ च्या शासन निर्णयान्वये जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती सुलभ करण्यासाठी मा.सामाजिक न्याय मंत्री यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. तसेच सदर विषयाबाबत दिनांक १९/९/२०१६ रोजी कार्यशाळा घेण्यात आली होती. या कार्यशाळेत झालेल्या चर्चेनुसार व उपरोक्त समितीने सुचविलेल्या उपाययोजनांच्या अनुषंगाने सुलभीकरणाचा प्रस्ताव तपासण्याची कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**साखरे (ता.विकमगड, जि.पालघर) येथील आश्रमशाळेतील विद्यार्थीनीचा निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्याबाबत**

**(६२) * २८९२४ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साखरे (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील शासकिय आश्रमशाळेत इयत्ता ६ वी मध्ये शिक्षण घेणारी कु.कौशल्या भरसट या विद्यार्थीनीचा उपचाराविना मृत्यू झाल्याचे तसेच कमल चौधरी या विद्यार्थीनीला उपचारासाठी नाशिक येथील रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने आश्रमशाळेतील अधिक्षक व संबंधित शिक्षक यांनी निष्काळजीपणा केल्याप्रकरणी चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) शासकीय आश्रमशाळा साखरे ता.विक्रमगड, जि.पालघर येथील कु.कौशल्या कुशा भरसट, इ. ६ वी या विद्यार्थीनीचा दिनांक ०७/१०/२०१६ रोजी सकाळी ६.३० चे दरम्यान विक्रमगड ग्रामीण रूग्णालय येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

दिनांक ०७/१०/२०१६ रोजी कु. कौशल्या कुशा भरसट या विदयार्थीनीच्या मृत्यूची बातमी इतर विदयार्थीनींना समजल्यावर मानसिक धक्का बसल्याने कु.कमल सुरेश चौधरी, इ. ९ वी या विदयार्थीनीला अचानक त्रास जाणवायला लागला म्हणून तिला पतंगशहा कुटीर रूग्णालय, जव्हार, जि.पालघर येथील वैदयकीय अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार जिल्हा रूग्णालय, नाशिक येथे दिनांक ०७/१०/२०१६ ते ११/१०/२०१६ पर्यंत उपचार करण्यात आले आहेत.
(२) व (३) सदर घटनेची दिनांक २१/१०/२०१६ रोजी सविस्तर चौकशी करुन या प्रकरणी श्री. प्रशांत एम. कोल्हे, अधिक्षक, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, साखरे, ता.विक्रमगड, जि.पालघर यांनी हलगर्जीपणा केल्याचे निदर्शनास आल्याने अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या दिनांक १६/११/२०१६ रोजीच्या आदेशान्वये त्यांना निलंबित करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

-----------------

## नागपूर येथील आदिवासी शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना मासिक निर्वाह भत्ता देण्याबाबत

**(६३) * २८९६८ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील आदिवासी शासकिय वसतिगृहातील विद्यार्थी मागील ६ महिन्यापासून मासिक भत्यापासून वंचित असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेल्या निर्वाह भत्ता या बाबीकरीता पुरेशी तरतूद नसल्याने नागपूर शहरामधील आदिवासी मुलांच्या १००० व मुलींच्या ५०० क्षमतेच्या या दोनच वसतिगृहातील विद्यार्थ्यांना माहे सप्टेंबर, २०१६ पासून ४ महिन्याचा निर्वाह भत्ता अदा करणे बाकी होते.

(२) शासन स्तरावरून सदर बाबीस पुनर्विनियोजनाद्वारे दिनांक १८/०१/२०१७ रोजी आवश्यक तरतूद उपलब्ध करण्यात आली असून सदर वसतीगृहांतील विद्यार्थ्यांचा माहे डिसेंबर, २०१६ पर्यंतचा मासिक निर्वाह भत्ता त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आला असून माहे जानेवारी, २०१७ करीता देयके मंजूर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## होनाड (ता.खालापूर, जि.रायगड) येथील ज्योती स्टील कारखान्यास स्थानिकांनी केलेला विरोध

**(६४) * २८०९४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) होनाड (ता.खालापूर, जि.रायगड) येथील ग्रामपंचायत हद्दीत ज्योती स्टील कारखाना नियमबाह्यरित्या सुरू असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखान्याच्या ध्वनी प्रदूषणाचा पातळगंगा विद्यालय होनाड या शाळेतील विद्यार्थी तसेच परिसरातील नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याने तेथील स्थानिकांचा सदर कारखान्यास विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात जिल्हाधिकारी, रायगड यांनी अलिबाग येथे जनसुनावणी घेतली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक ०२/०३/२०१६ रोजी सदर उदयोगास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यानुसार सदर कारखान्यातील जास्त ध्वनी निर्माण करणारे विभाग जसे रोलींग मिल दिवसा चालवले जात नाही जेणेकरुन शाळेत ध्वनी प्रदुषणाचा त्रास कमी होईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बिगरशेती नागरी पतसंस्थांनी कर्जवाटप करतांना उपविधीमधील तरतुदींचे पालन केले नसल्याबाबत

**(६५) * २८२१९ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५ हजार १८२ बिगरशेती नागरी पतसंस्थांकडे सामान्य नागरिकांनी मोठया प्रमाणावर ठेवी ठेवल्या असून सदर पतसंस्थांनी कर्जवाटप करतांना उपविधीमधील तरतुदींचे पालन केले नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय अंशत: खरे आहे.

राज्यातील एकूण १४५७७ ग्रामीण बिगरशेती/नागरी सहकारी पतसंस्थांपैकी ७६ ग्रामीण बिगरशेती/नागरी सहकारी पतसंस्थांनी कर्ज वाटप करताना उपविधीतील तरतुदीचे पालन केले नसलेबाबत वैधानिक लेखापरिक्षण, चाचणी लेखापरिक्षण तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ अ अन्वये झालेल्या तपासणी मध्ये आढळून आले आहे.

(२) सदर ७६ संस्थांनी उपविधीमधील तरतुदीचे पालन करताना कसुर केल्याबाबत त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ व कलम ८२ नुसार निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ नुसार चौकशी करण्याबाबत व कलम ८८ अन्वये आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्याबाबतचे आदेश पारीत करण्यात आले आहेत.

चौकशी पूर्ण झालेल्या ९ संस्थेच्या १११ संचालक/अधिकारी/कर्मचारी यांचेवर रक्कम रुपये ४३३८.६ लाख इतकी जबाबदारी निश्चित करण्यात आलेली असून त्यापैकी जबाबदारी निश्चित केलेल्या १४ व्यक्तींकडून रक्कम रुपये १०.५९ लाख वसुल करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरीत रक्कम जबाबदारी निश्चित केलेल्या व्यक्तींकडून वसूल करणेचे अनुषंगाने कारवाई सुरू आहे.

एकूण २६ पतसंस्थांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले असून गुन्हा दाखल व्यक्तीची संख्या ३२७ असून त्यापैकी ९९ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महावितरणाच्या तीन विभागातील मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांस आर्थिक मदत देण्याबाबत

**(६६) * २७८८८ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण, महापारेषण व महानिर्मितीमध्ये दरवर्षी अनेक कर्मचाऱ्यांचा मृत्यू होत असून त्यांच्या मृत्यूनंतर वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरीवर घेण्याचे शासनाचे धोरण असून त्यानुसार महावितरण कंपनीमध्ये कार्यवाही केली जात नसल्याने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणाच्या कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच कुटुंबातील एका व्यक्तीस अनुकंपा तत्वावर नोकरी देणेबाबत शासनाची भुमिका काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) मृत कर्मचाऱ्याच्या अवलंबितास आर्थिक मदत देण्याबाबत व अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याबाबत महावितरण कंपनीकडून त्यांच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही केली जाते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महानिर्मिती, महावितरण व महापारेषण कंपनीतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्यांबाबत

**(६७) * २७०३३ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानिर्मिती, महावितरण व महापारेषण कंपनीतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतन, विसंगती प्रकरणे, वैद्यकिय प्रतिपूर्ती, वारसांना आरक्षण, भविष्य निर्वाह निधी इत्यादी समस्या प्रलंबित असल्याचे दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दिनांक २६ मे, २०१५ रोजी मा. ऊर्जा मंत्री यांच्या दालनात बैठक घेवून सदर प्रकरणी अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यांत येवूनही त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडून विहित वेळेत प्रकरणे सादर न होणे, तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता वेळेत न होणे यामुळे प्रकरणे प्रलंबित रहात असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कंपनी व्यवस्थापनाकडून प्राधान्याने प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे तेरणानगर ढोकी (ता.जि.उस्मानाबाद) वसाहतीतील बंद केलेला विद्युत पुरवठा सुरु करण्याबाबत

**(६८) * २९४३४ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तेरणानगर ढोकी वार्ड क्र. ६ (ता.जि.उस्मानाबाद) येथील वसाहतीमध्ये राहत असलेल्या रहिवाश्यांना कंपनीमार्फत विद्युत पुरवठा केला जातो, परंतु कंपनीने विद्युत बिले न भरल्याने विदयुत पुरवठा बंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसाहतीचा विदयुत पुरवठा बंद करण्यात आल्याने वसाहतीत राहणाऱ्या रहिवाश्यांचा पाणीपुरवठा बंद झाला असून विद्यार्थ्यांच्या परिक्षा चालू असल्याने त्यांच्या अभ्यासावर देखील परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नविन डिमांड भरुन वीज जोडणी मिळणेबाबत रहिवाश्यांनी दिनांक ८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद यांच्याकडे अर्ज दाखल करुनही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) मौजे तेरणानगर, ढोकी वॉर्ड क्र. ६ (ता.जि. उस्मानाबाद) येथील तेरणा सहकारी साखर कारखाना यासाठी उच्चदाब ग्राहक क्रमांक ५९००१९००१०१८ ही औद्योगिक वापराची वीज जोडणी होती. त्यामधून कारखान्याच्या वसाहतीस वीज पुरवठा करण्यात येत होता. तसेच पाणीपुरवठयासाठी उच्चदाब ग्राहक क्रमांक ५९००१९००१०९३ या विद्युत जोडणीमार्फत विद्युत पुरवठा करण्यात येत होता. सदर दोन्ही उच्चदाब ग्राहकांना वेळोवेळी सूचना देऊनही थकबाकीची रक्कम न भरल्याने या दोन्ही ग्राहकांचा वीजपुरवठा दिनांक २.२.२०१३ रोजी कायमस्वरुपी बंद करण्यात आला. तसेच महावितरणमार्फत कायदेशीर कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) दिनांक २९ ऑक्टोबर, २०१६ रोजी तेथील रहिवाशांनी स्वतंत्र वीज जोडणी मिळणेबाबतचे अर्ज शाखा कार्यालय, ढोकी येथे सादर केलेले होते. तथापि, सदर जागेवर असलेल्या थकीत रक्कमेचा भरणा केल्यानंतर व नवीन वीज पुरवठ्यासाठीच्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर महावितरण कंपनीच्या नियमानुसार नव्याने विद्युत पुरवठा करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंध व्यक्तीला स्वावलंबी बनविण्यासाठी तसेच त्यांच्या पुनर्वसनासाठी आखण्यात आलेल्या योजनांची अंमलबजावणी होण्याबाबत**

**(६९) * २८०६० प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंध व्यक्तींना स्वावलंबी बनविण्यासाठी तसेच त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाने अनेक योजना आखल्या असून सदर योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याने अंध व्यक्ती लाभापासून वंचित राहत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजना राबविण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता शासनाच्या विविध खात्यातून होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अंध तसेच सर्व प्रकारच्या अपंग व्यक्तींकरीता वेगवेगळ्या योजना राबवून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जैतापूर (जि.रत्नागिरी) येथील अणुऊर्जा प्रकल्पाच्या सद्यस्थितीबाबत**

**(७०) * २७३३८ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जैतापूर (जि.रत्नागिरी) येथे सुरु करण्यात येणा-या ९,९०० मेगावॅट क्षमतेच्या जगातील मोठया अणुऊर्जा प्रकल्पाचे विकासक असलेल्या फ्रेंच कंपनीबरोबर तंत्रज्ञानाच्या मुद्यांसह सर्व निकषांवर सहमती होऊन या प्रकल्पातील उत्पादित होणाऱ्या वीजेचा दर निश्चित झाला आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली व त्यानुसार वीज निर्मिती केव्हापासून सुरु होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अद्याप वीज दर निश्चित झालेला नाही.
(२) व (३) सदरचा प्रकल्प हा केंद्र शासनाच्या अखत्यारित असून तो न्युक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (एन.पी.सी.आय.एल) व अरेवा या फ्रेंच कंपनीमधील करारानुसार सुरु आहे. सदर प्रकल्पाच्या तांत्रिक व वाणिज्यिक बाबी संदर्भात दोन्ही कंपन्यांमध्ये चर्चा सुरु आहे. सदर प्रकल्पातून वीज निर्मिती कधी होईल हे सदर प्रकल्पाचे बांधकाम प्रत्यक्षात सुरु होईल त्यावेळी ठरेल.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.